# किशाभाऊ आणि त्यांचे सहकारी

शिरीष पटवर्धन



नमस्कार देवा तुला आमुचा हा,
करी आमुची मायभूमी महा!



# किशाभाऊ आणि त्यांचे सहकारी

श्री. शिरीष पटवर्धन
उपाध्यक्ष ‘स्व’-रूपवर्धिनी

**‘स्व’ रूपवर्धिनी**
२२/१ मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.
दूरध्वनी क्र. ०२०–२६१२१७०४, ९०११३८६३८६
ई-मेल : wardhinee@gmail.com / relations@swaroopwardhinee.org
Website : www.swaroopwardhinee.org



# प्रार्थना

नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ।।

हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ।। १।।

जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।। २।।

स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती-ध्यास हा ।। ३।।

प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणूरेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे, ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।। ४।।

# प्रस्तावना

'स्व'–रूपवर्धिनी या नावाने समाजात पोहोचलेल्या शिक्षण क्षेत्रातील या स्वयंसेवी संस्थेचे काम १९७९ साली सुरु झाले. शिक्षण क्षेत्रातील काम असले तरी ही औपचारिक शाळा नाही. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी आणि चांगला नागरिक घडावा यासाठी जे विषय, जी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवली पाहिजेत अशा विषयांसाठी औपचारिक शाळेच्या वेळानंतर चालणारे आणि प्राधान्याने ज्या विद्यार्थ्यांमध्ये विकास क्षमता आहे परंतु आर्थिकदृष्ट्या किंवा सामाजिकदृष्ट्या अडीअडचणीना सामोरे जावे लागते, अशा सेवा वस्त्यांमधील, गरीब नागरी वस्त्यांमधील मधील मुलांसाठी हे काम मंगळवार पेठेमध्ये सुरु झाले.

पुण्याच्या पूर्व भागातील राजा धनराज गिरजी विद्यालयामध्ये आधी शिक्षक आणि नंतर मुख्याध्यापक म्हणून काम केलेल्या कृष्णाजी लक्ष्मण तथा किशाभाऊ पटवर्धन यांनी या संस्थेची स्थापना केली. अशिक्षित पालक, आर्थिक चणचण, कुठे घरातील पालकांच्याच व्यसनाचा गंभीर प्रश्न तर कुठे घराभोवतालचे वातावरण विकासाला अडथळा आणणारे अशा घरांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने रा.ध.गिरजी विद्यालयात येत असत. अशा विद्यार्थ्यांचा भविष्यकाळ कोमेजून जावू नये यासाठी पटवर्धन सरांनी केलेल्या अथक प्रयत्नामुळे शेकडो विद्यार्थी आज सुखी जीवन जगत आहेत. परंतु पटवर्धन सरांचे मन अस्वस्थ होते कारण अशाही प्रतिकूल वातवरणात जन्माला येणाऱ्या बुद्धिमान मुलांचे भविष्य कसे कोमेजून जावू शकते किंवा कसे वाया जावू शकते याची उदाहरणे त्यांच्यासमोर होती. अशा बुद्धिमान मुलांचे भविष्य वाया जावू नये यासाठी काम करण्याची आवश्यकता त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यामुळे डिसेंबर १९७८ मध्ये निवृत्त होताच पटवर्धन सरांनी असे काम सुरु करण्याचे ठरवले. आपल्या

मनातील विचार आपल्या काही सहकारी शिक्षकांशी तसेच अन्य क्षेत्रातील परंतु शिक्षणाच्या बाबतीत अनुकूल असणाऱ्या काही सहकाऱ्यांशी बोलून दाखवला. या सर्व चर्चांमधून, सहविचारातून १३मे १०७९ रोजी 'स्व'-रूपवर्धिनीचे काम सुरु झाले. काम सुरु झाले तेव्हा संस्थेला काही नांव नव्हते. १९८१ मध्ये सर्व कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करून धर्मादाय न्यास तसेच सोसायटी कायद्याखाली संस्थेची नोंदणी 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने झाली.

जेव्हा संस्थेला काही दाखवण्यासारखे अस्तित्व नव्हते, कोणत्याही व्यवस्था मार्गी लागलेल्या नव्हत्या, आर्थिक रचना नव्हती अशा वेळी आपले नांव, आपला वेळ, आपले कर्तृत्त्व अशा केवळ कल्पनेतून मांडलेल्या संस्थेच्या कामासाठी देणे ही सोपी गोष्ट नव्हती. संस्थापक सदस्य म्हणून ज्या ज्या व्यक्तिनी त्या वेळी किशाभाऊ पटवर्धन सरांना साथ दिली त्या सर्वांचे फार मोलाचे योगदान संस्था उभारणीत झालेले आहे आणि त्यांचा अल्प परीचय समाजा समोर ठेवणे आवश्यक वाटले.

केवळ संस्थापक सदस्यच नाही तर गेल्या त्रेचाळीस वर्षांच्या संस्थेच्या वाटचालीत वर्धिनीच्या कार्यकारिणीचे सदस्य म्हणून, अनेकांनी तर कोणतेही पद नसताना हे काम महत्त्वाचे आहे म्हणून आपला वेळ दिला, वर्धक-वर्धिकांच्या जडणघडणीत खूप वर्षे काम केले, अशा ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा परिचय सुद्धा समाजासमोर येणे आवश्यक आहे. या सर्वांना अभिवादन करण्याच्या हेतूने ही छोटी पुस्तिका तयार केली आहे.

## संस्थापक अध्यक्ष :
# कै. पुरुषोत्तम वल्लभदास श्रॉफ



उद्योग जगतातील आणि शैक्षणिक क्षेत्रातील पुण्यातील एक ख्यातनाम व्यक्तिमत्त्व म्हणजे पुरुषोत्तमभाई श्रॉफ. वयाच्या ८५ व्या वर्षापर्यंत म्हणजे आयुष्याच्या अगदी शेवटच्या क्षणापर्यंत ते सतत कोणत्या ना कोणत्या नव्या कामाचा विचार करणारे आणि मनात रुंजी घालत असलेले काम प्रत्यक्ष उभे करण्यासाठी वय विसरून आश्चर्यकारक उर्जेने ते काम करीत होते. नुसत्या उद्योग क्षेत्राचा विचार केला तर Textile, Sewing Threads, Yarn Processing, Chemicals, Steel Consignment gency  Transport अशा अनेक विषयात त्यांनी आपली छाप उमटवली होती.

शिक्षण क्षेत्रातही त्याच्या दूरदृष्टीचा लाभ अनेक शिक्षण संस्थाना झाला. पुण्यातील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, शिक्षण प्रसारक मंडळी, ज्ञान प्रबोधिनी या सारख्या नामांकित शिक्षण संस्थांना त्यांनी अनेक वर्षे आपल्या कर्तृत्त्वाचा, ज्ञानाचा, समाजातील संपर्काचा फायदा मिळवून दिला. कर्वे स्त्री शिक्षण संस्थेमध्ये पदाधिकारी म्हणून कार्यरत असताना आर्किटेक्चर महाविद्यालय तसेच फॅशन डिझायनिंग महाविद्यालय हे त्यांच्या कल्पनेतून आणि दूरदृष्टीतून सुरु झाले आणि आज नावारूपाला आले आहे. शिक्षण प्रसारक मंडळी या संस्थेत सुद्धा अनेक वर्षे ते पदाधिकारी होते आणि त्या कालावधीत त्यांनी सुरु केलेले नारळकर इनस्टीट्युट तसेच मुंबई येथील व्यवस्थापन विषयातील ख्यातनाम वेलिंगकर इनस्टीट्युट सुरु करण्यात आणि नावारूपाला आणण्यासाठी त्यांनी अविरत मेहनत घेतली.

शिक्षण संस्थांप्रमाणेच सामाजिक आणि धार्मिक संस्थांमध्येही पुरुषोत्तमभाई तेवढेच सक्रीय होते. नाथद्वारा टेम्पल बोर्डचे पदाधिकारी तर रामकृष्ण मिशन, वृंदावनचे ते एक हक्काचे सहाय्यकर्ते होते. कास्प, पुना क्लब, पुना गुजराथी बंधू, बार नाटय मंडळ, मोडवाणी मित्र मंडळ अशा अनेक संस्थांमध्ये ते कार्यरत होते.

रा.स्व.संघाचे स्वयंसेवक या नात्याने किशाभाऊ पटवर्धन आणि त्यांचा अनेक वर्षांचा परिचय होता तसेच शिक्षण क्षेत्रात कार्यरत असल्याने दोघांची घनिष्ट मैत्री होती. 'स्व'–रूपवर्धिनीचे काम सुरु करण्यापूर्वी ज्या निवडक मित्रमंडळीं बरोबर किशाभाऊ पटवर्धन सरांनी या संबंधी चर्चा केली, आपल्या कल्पना मांडल्या त्यामध्ये पुरुषोत्तमभाई होतेच. इतकेच नव्हे तर हे नव्याने सुरु होणारे काम जागेवाचून अडू नये म्हणून मंगळवार पेठेतील, बारणे रस्त्यावरील त्यांच्या 'रामकृष्ण थ्रेड' या छोट्या कारखान्याची शेड त्यांनी या कामाला वापरायला देऊन टाकली.

हळू हळू संस्थेला नांव मिळाले, काम वाढायला लागले तशा नव्या कल्पनाही पुढे येवू लागल्या. अशा सर्व नव्या योजना साकारताना संगम पुलावरील त्यांचा कारखाना ही वर्धिनीची हक्काची जागा होती तसेच सुरुवातीच्या काळात आर्थिक चणचण कामाला जाणवणार नाही याचीही काळजी संस्थापक अध्यक्ष या नात्याने पुरुषोत्तमभाई घेत असायचे.

काळाच्या ओघात वर्धिनीचे काम विस्तारले. या विस्ताराच्या प्रत्येक टप्प्यावर किशाभाऊ आणि पुरुषोत्तमभाई हे जोडीने आणि संपूर्ण उर्जेने कार्यरत असायचे. २००४ मध्ये किशाभाऊ पटवर्धन सरांचे वृद्धापकाळामुळे दु:खद निधन झाले. किशाभाऊ आणि त्यांच्या मनामध्ये अनेक वर्षे गरजू मुली–महिलांसाठी स्वतंत्र इन्स्टीट्युट सुरु करण्याची योजना होती कर्वे स्त्री शिक्षण संस्था किंवा शि.प्र.मंडळी या संस्थासाठी जशा उपयुक्त विषयाला वाहिलेल्या नव्या योजना साकारल्या तशी वर्धिनीसाठी एखादी नवी कल्पना साकारावी असे त्यांच्या मनात होते. त्यासाठी चऱ्होली येथे जागा मिळवण्याचे प्रयत्न सुरूही होते. काही अडचणी येत होत्या. अशावेळेला पुरुषोत्तमभाई यांनी चऱ्होली येथील स्वत:ची एक एकर


जागा २००७ मध्ये दानपत्राने वर्धिनीच्या नावे केली. या जागेवर त्यांच्या आणि किशाभाऊ पटवर्धन यांच्या मनात असलेला गरजू महिलांसाठीचा प्रकल्प स्व–रूपवर्धिनी कौशलय विकास प्रशिक्षण केंद्र या नावाने तीन मजली भव्य वास्तूमध्ये नुकताच उभा राहिला आहे. दुर्दैवाने स्वप्न साकारलेले पहायला किशाभाऊही नाहीत आणि पुरुषोत्तमभाई सुद्धा नाहीत. २०२० हे वर्ष किशाभाऊंचे आणि आण्णासाहेब गोगावले यांचे जन्मशताब्दी वर्ष होते, तर २०२४ हे पुरुषोत्तमभाई यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यांचे स्वप्न त्यांच्या जन्मशताब्दीच्या कालावधीत साकारल्याचे समाधान वर्धिनीला अराहे. पण २०१० मध्ये पुरुषोत्तमभाई यांचे सुद्धा वृद्धापकाळामुळे निधन झाले.

एखादी कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी कै.किशाभाऊ पटवर्धन यांच्या बरोबरीने कै.पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांनी जवळपास तीन दशके जे कष्ट घेतले त्यामुळे आज वर्धिनी नावारूपाला आलेली आहे.



### संस्थापक उपाध्यक्ष :

## कै. अनंत नृसिंह तथा अण्णासाहेब गोगावले



अण्णांचा जन्म १९२० च्या अनंत चतुर्दशीचा. अण्णा मुळ साताऱ्याचे अण्णा लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले.

अण्णांची खाण्या-पिण्याची आबाळ होऊ नये म्हणून त्यांच्या आत्याने त्यांना पुण्यात आणले. अण्णांनी नु.म.वि. शाळेत प्रवेश घेतला. घरची जबाबदारी लक्षात घेऊन अण्णा लहानपणातच व्यवसायात पडले. या धडपडीतूनच स्वत:च्या हिमतीवर त्यांनी ए.एन.गोगावले रोड अँड बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर नावाची फर्म सुरु केली. हा काळ ब्रिटीश राजवटीचा होता. अण्णांकडे त्यावेळी मिलीटरीची पण कामे असत. त्यामुळे फर्मच्या ट्रकवर 'ON MILITRY DUTY' अशी पाटी असे. या पाटीमुळे ब्रिटीश अधिकारी या ट्रकची झडती घेत नसत. अण्णा हे स्वातंत्र्य चळवळीत होते आणि महात्मा गांधींच्या नेतृत्त्वाखाली असलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते होते. राष्ट्रीय स्तरावरील अनेक ज्येष्ठ नेत्यांबरोबर त्यांचे स्नेहपूर्व नाते होते. व्यवसाया निमित्त हातात असलेल्या या ट्रकचा उपयोग देशाभक्त अण्णांनी अनेकवेळा बेमालूम पणे केला आणि अनेक भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांची ट्रकमधून ने आण केली, त्यांना शिधा, रॉकेल अशा आवश्यक सुविधा पुरवल्या. मंगळवार पेठेतील घरातही असे अनेक भूमिगत क्रांतिकारक मुक्काम करून जात.

व्यवसायात अण्णांचे नांव खूप मोठे होते. त्या काळात मुळशी धरणाचे काही काम, लोहगाव विमानतळ, येरवडा जेल, ससून हॉस्पिटल, जिल्हा

परिषद बिल्डिंग अशा पुण्यातील महत्त्वाच्या ठिकाणांच्या बांधकामात त्यांचा मोठा वाटा होता.

१९४२ मध्ये महात्मा गांधीनी 'चले जाव' चा नारा दिला आणि त्या पार्श्वभूमीवर मुंबई येथे काँग्रेसचे अधिवेशन घेण्याचे ठरले. हातात वेळ कमी होता आणि अधिवेशनाचा खर्च कसा उभा करायचा असा प्रश्न होता. अण्णांनी त्यावेळेला होणाऱ्या परिणामांचा जराही विचार न करता आपल्या घरातील होते नव्हते ते सर्व सोने सोन्यामारुती चौकातील पिंपळगांवकर सराफ यांच्याकडे गहाण ठेवले आणि आलेली सर्व रक्कम काँग्रेसच्या या महत्त्वपूर्ण अधिवेशनासाठी खर्च केली.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर अण्णा राजकारणात सक्रीय राहिले नाहीत पण सर्व पक्षांच्या सर्व प्रमुख लोकांशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध कायम राहिले कारण या सर्वांच्या मनात अण्णांबद्दल विलक्षण आदर होता. राजकारणापेक्षा अण्णा त्यांच्या मुळ स्वभावानुसार धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात रमले ते त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत. किसान महाराज साखरे यांच्या समवेत अण्णांनी आळंदी येथील अनेक कामे केली. त्यांच्या समवेत आळंदी ते पंढरपूर पायी यात्राही केली आणि पंढपूर वारीमध्ये फिरत्या दवाखान्याची सोय पहिल्यांदा अण्णांच्या प्रयत्नातून झाली.

अण्णा अनेक संस्थांचे पदाधिकारी होते. त्यातील काही महत्त्वाच्या म्हणजे 'स्व'–रूपवर्धिनी, ज्ञानेश्वरी सत्संग मंडळ, पुणे कडबाकुट्टी कारखानदार संघ प्रा.लि.,शिक्षण प्रसारक मंडळी, फर्ग्युसन कॉलेज, कॅम्प एज्युकेशन सोसायटी इ. या व अशा अनेक संस्थांच्या लोकांसाठी अण्णांचे घर हे हक्काचे ठिकाण असे आणि त्यांच्या घरातील हॉलमध्ये अनेक संस्थांचे, व्यक्तींच्या जीवनातील गंभीर विषय मार्गी लागले तर आपल्या आयुष्यातील आनंदाचे अनेक क्षणही अनेकांनी याच हॉल मध्ये अनुभवले.


'स्व'–रुपवर्धिनीच्या स्थापनेपासून याच जागेत वर्धिनीच्या वाढीची चर्चा करणाऱ्या अनेक बैठका झाल्या. संस्थात्मक पातळीवरील कामापासून ते

रोजच्या कामात येणाऱ्या अडचणी घेऊन वर्धिनीचे काम करणारे कोणी ना कोणी अण्णांकडे जायचे आणि आलेली अडचण सुटल्याचा आनंद घेऊन परतायचे.  स्थानिक प्रश्न असो किंवा शिक्षण मंडळाकडे अडलेला परवानगीचा अर्ज असो, अण्णांनी लक्ष घातले की काम मार्गी लागायचेच. तरीही नव्या नव्या अडचणी यायच्या.

अशाच एका क्षणी 'स्व'–रुपवर्धिनीला महानगरपालिकेने शाळा वापरण्याची दिलेली परवानगी रद्द झाली आणि मुलांचे खेळ कुठे घ्यावे, अभ्यास तास कुठे घ्यावेत असा प्रश्न निर्माण झाला. अण्णा आणि कांचनभाई शाह यांनी हा प्रश्न लगेचच सोडवला. कडबाकुट्टी संघाच्या वजनकाट्यावरची मोकळी जागा 'मैदान' झाले तर वजनकाट्याच्या 'ऑफिस' मध्ये आणि कांचनभाईंच्या कडबाकुट्टीत अभ्यास तास सुरु झाले.

अशी अडचण यापुढे येवू दयायची नसेल तर वर्धीनीला स्वत:ची जागा मिळवायला हवी असा विचार वर्धिनीच्या कार्यकारिणीत वारंवार येवू लागला. मितभाषी अण्णांनी हे काम मनावर घेतले. त्यांच्या भोवती असलेल्या मित्रांमुळे, त्यांच्या एकूण सात्विक वृत्तीमुळे मंगळवार पेठेत जिथे वर्धिनीचे काम सुरु झाले त्याच भागातील एका छोट्या मोकळ्या प्लॉटचा मालक अण्णांकडे अपार्टमेंट बांधण्याची ऑफर घेऊन आला. या मालकाशी अण्णांनी संवाद साधला, त्यांच्या जागेसंबंधी आलेल्या काही कायदेशीर अडचणी दूर केल्या आणि त्याच व्यक्तीकडून हा प्लॉट वर्धिनीसाठी मिळवला. रीतसर खरेदीखत झाले. अल्पवावाधीतच या जागेवर वर्धिनीची देखणी इमारत उभी राहिली आणि वर्धिनीचा वनवास कायमचा संपला. वर्धिनीचे आजचे हे वैभव अण्णासाहेबांसारख्या मितभाषी पण कर्तृत्त्ववान विश्वस्तांमुळे निर्माण झाले आहे.

# संस्थापक कार्याध्यक्ष:
# कै. कृष्णाजी लक्ष्मण
# तथा किशाभाऊ पटवर्धन



ज्यांच्या मूळ संकल्पनेतून वर्धिनीच्या कामाचा जन्म झाला ते म्हणजे किशाभाऊ पटवर्धन सर. किशाभाऊ मूळ मुंबईचे. निवृत्तीनंतर वडील कुटुंबाला घेऊन १९३४–३५ च्या दरम्यान पुण्याला माडीवाले कॉलनी मध्ये आले. याच दरम्यान श्री. शंकरराव कानिटकर यांनी आपल्या काही सहकाऱ्यांच्या मदतीने मॉडर्न हायस्कूलची स्थापना केली होती. किशाभाऊंनी या शाळेत प्रवेश घेतला. लहानपणापासून संघाच्या शाखेत जाणाऱ्या किशाभाऊ पटवर्धन यांच्या व्यक्तिमत्त्वातच नेतृत्वाचे गुण होते. त्यामुळे शाळेत असतानाच त्यांनी आपल्या अनेक मित्राना संघ शाखेची गोडी लावली होती.

ते स्वत:ही संघ शाखेच्या कामात शालेय वयापासून सक्रीय होते. इंटरच्या शिक्षणानंतर विस्तारक म्हणून ते काही काळ खेड (राजगुरुनगर) येथे होते. या काळात केलेल्या कामामुळे, संपर्कामुळे त्यांच्या मनात संघाचा प्रचारक म्हणून जाण्याचा विचार दृढ होऊ लागला. संघाने त्या काळातच असे ठरवले होते की प्रचारक म्हणून जाणारी व्यक्ती किमान पदवीधर असली पाहिजे. त्यामुळे पदवीचे शिक्षण पूर्ण करून किशाभाऊ संघाचे प्रचारक म्हणून बाहेर पडले. धुळे, चाळीसगाव या भागामध्ये सहा वर्षे प्रचारक म्हणून त्यांनी संघाच्या कामाचा खूप प्रसार केला. याच कालावधीत महात्मा गांधींच्या दुर्दैवी हत्येनंतर संघावर बंदी आली आणि या काळात बंदीविरुद्ध झालेल्या सत्याग्रहामुळे किशाभाऊंना काही महिने तुरुंगवास भोगावा लागला.

१९५१ मध्ये पुण्यात परतल्यावर किशाभाऊ राजा धनराज गिरजी विद्यालयामध्ये शिक्षक म्हणून नौकरीला लागले. शिक्षकी पेशात स्थिर होत असतानाच आपल्या पत्नी सौ लीलाताई यांच्या मदतीने किशाभाऊ व्यक्तिगत जीवनात स्थिर होण्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी मिळवण्यासाठी सिद्ध झाले. अगदी गुऱ्हाळ चालवण्यापासून ते आंबे विकणे, प्रसाद मासिकाचे सदस्य वाढवणे, शेअर्स अशा वेगवेगळ्या माध्यमातून प्रचंड कष्ट करीत होते.

हे सर्व करीत असताना शिक्षक म्हणून ते अत्यंत जागरूक आणि सक्रीय होते. व्यक्तिगत संवाद आणि संपर्कातून त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा दाखवली. शिक्षण क्षेत्राची मनापासून आवड असलेले किशाभाऊ, संघातील त्यांचे एक ज्येष्ठ सहकारी अप्पा पेंडसे बुद्धिमान विद्यार्थ्यांसाठी सुरु करीत असलेल्या नव्या शिक्षण प्रयोगाकडे आकृष्ट झाले. 'ज्ञानप्रबोधिनी' या नावाने सुरु झालेल्या या संस्थेच्या स्थापनेपासून किशाभाऊ या कामात सक्रीय झाले. पुढे तर या संस्थेचे जनसंपर्क अधिकारी म्हणून त्यांनी कामही पाहिले.

बुद्धिमान मुलांसाठी केलेल्या विशेष प्रयत्नांतून नेतृत्व कसे विकसित होते याचा किशाभाऊ स्वत: ज्ञानप्रबोधिनीच्या कामात अनुभव घेत होते. त्याच वेळेला शिक्षक आणि पुढे मुख्याध्यापक म्हणून ते ज्या शाळेत होते, त्या आर.डी. शाळेतील बुद्धिमान परंतु आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीमुळे विकासाची संधी न मिळणाऱ्या गरीब सेवावस्त्यांमधील मुलांच्या भविष्याचे काय? असा प्रश्न त्यांच्या मनात सदैव होता. ते नेहमी म्हणायचे

"It is the real national wealth, if you attend them. if not, it may turn out to be a national nuisance"

आपल्या मनातील या अस्वस्थतेला त्यांनी निवृत्त झाल्या झाल्या वाट करून दिली. डिसेंबर १०७८ मध्ये ते निवृत्त झाले आणि १३ मे १९७९ ला समाजातील आर्थिक सामाजिक कमकुवत समाजघटकातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी आपल्या या सहकाऱ्यांच्या मदतीने

‘स्व’–रुपवर्धिनीची स्थापना केली. ज्या मुलांमध्ये विशेष चमक आहे, धमक आहे, अशा मुलांची निवड करून औपचारिक शाळेनंतरची ही आगळी वेगळी शाळा सुरु झाली. ३६५ दिवस चालणाऱ्या या प्रकल्पात सुरुवातीला फक्त १२ मुलं होती. आज पुण्यात १६ ठिकाणी चालणाऱ्या या प्रकल्पाचा लाभ शेकडो मुलं मुली घेत आहेत.

या मुख्य कामाबरोबरच बालवाडी, गरजू महिलांसाठी उद्योग शिक्षण वर्ग, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी फिरती प्रयोगशाळा, शासनात अधिकारी होण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदशन केंद्र असे अनेक प्रकल्प सुरु झाले. ज्या संस्थेला स्वत:ची ओळख नव्हती, स्वत:चे वेगळे स्थान नव्हते, ते सर्व किशाभाऊ पटवर्धन सरांच्या अथक मेहनतीने साकारले. निवृत्ती नंतर संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षा पर्यंत किशाभाऊ पटवर्धन प्रचंड उर्जेने कार्यरत होते. २००४ साली वयाच्या ८५व्या वर्षी त्यांचे दु:खद निधन झाले.



# संस्थापक कोषाध्यक्ष :
# श्री श्रीकांत सामल



मुळचे मुंबईचे असणाऱ्या श्रीकांत सामल यांनी आपले सिव्हील इंजिनिअरींगचे शिक्षण पूर्ण झाल्यावर बांधकाम क्षेत्रातच कार्यरत असलेल्या आपल्या वडिलांच्या म्हणजे शंकरराव सामल यांच्या हाताखाली काम करायला सुरुवात केली. त्यातून व्यवसायाला आवश्यक अशा अनेक गोष्टी तर ते शिकलेच पण वडिलांकडून त्यांनी जी तत्वे आत्मसात केली आणि सातत्याने त्या मार्गाने वाटचाल केली ती तत्वे अशी होती–

१) जे काही काम करायचे ते चांगलेच करायचे (No Quality Compromise)

२) खात्रीलायक आणी चांगलाच माल वापरायचा

३) काम छोट्या बंगल्याचे असो अथवा एखाद्या उद्योग समुहाचे, कुशल कामगारांचा अधिक वापर करायचा.

४) बांधकामामध्ये सिमेंट वापरण्याचे जे प्रमाण आहे त्यात कधीही तडजोड करायची नाही.

या तत्वांच्या मार्गावरून चालल्याने प्रसंगी व्यवसाय तुलनेत थोडा कमी झाला असेल पण त्यांच्या नावाला एक दर्जेदार बांधकाम व्यावसायिक असे वजन प्राप्त झाले आणि त्यामुळे उद्योग व्यवसायातील दिग्गज माणसांनी सुद्धा त्यांच्या या गुणवत्तेला संधी दिली. मंदीचा काळ, अपेक्षित गतीने नवी कामे न मिळणे, लोकांकडून येणे असलेली रक्कम वेळेवर न मिळणे या व अशा उद्योग व्यवसायात येतात त्या सर्व अडचणी त्यांच्याही वाट्याला आल्या पण रोजच्या दिनक्रमात न चुकता केली जाणारी ध्यान

धारणा, गोंदवलेकर महाराजांच्या विचारांचे चिंतन या गोष्टींमुळे अशा अवघड परिस्थितीवर ते मात करू शकले.

ज्ञान प्रबोधिनीच्या इमारतीच्या बांधकामाच्या निमित्ताने त्यांचा व किशाभाऊ पटवर्धन यांचा परिचय होताच. 'स्व'–रुपवर्धिनीच्या स्थापनेपासून ते या कामाशी जोडले गेले. स्थापनेपासून सुमारे तीन दशके त्यांनी कोषाध्यक्ष या नात्याने संस्थेचे काम पाहिले. त्यांच्या या पदावर असण्याने मुख्य एक गोष्ट वर्धिनीच्या वाटचालीत रुजली ती म्हणजे आर्थिक शिस्त. या शिस्तीच्या आग्रहामुळे सार्वजनिक संस्था म्हणून वर्धिनीला कोणतेही शासकीय अर्थ साह्य नसताना स्वत:च्या हिमतीवर वाटचाल करता आली.

बांधकाम क्षेत्रातील आणि गुणवत्तापूर्ण बांधकामासाठी ख्यातनाम असूनही संस्थेचे विश्वस्त असल्याने मंगळवार पेठेत वर्धिनीची इमारत बांधण्याचे काम त्यांनी स्वीकारले नाही. अशी नैतिकता जपणाऱ्या विश्वस्तांमुळे संस्थेचे समाजात एक आदराचे स्थान निर्माण झाले आहे.

वयाची ८० वर्षे पूर्ण झाल्यानंतरही आज चऱ्होली येथे संस्थेचा जो विस्तार बांधकाम प्रकल्प उभा राहिला आहे त्या कामासाठी ते वेळ काढून त्यांच्या अनुभवाचा लाभ संस्थेला देत होते.




इमारत उद्‌घाटन प्रसंगी आशीर्वाद देताना प.पू.बाळासाहेब देवरस

## संस्थापक कार्यवाह :
# कै. रामकृष्ण परशुराम देसाई



रा.प. या टोपण नावाने जास्त परिचित असलेले देसाई सर ही संस्थेला स्थापनेच्या वेळीच मिळालेली मोठी देणगी म्हणावी लागेल. जाणून घ्यावं आणी अनुकरण करावं असं हे व्यक्तिमत्त्व होतं. देसाई सर कृषी खात्यातून अधिकारी पदावरून निवृत्त झाले होते. संपर्कात आले तेव्हा फार बोलायचे नाहीत पण जे बोलायचे ते अगदी स्पष्ट. पण त्या स्पष्टवक्तेपणाला आत्मीयतेचा ओलावा असायचा. सामाजिक काम हे तर बहुदा त्यांच्या रक्तातच होते त्यामुळे लहानपणी जेव्हा ते कोल्हापूरला होते तेव्हा शाळेत जाताना दररोज त्यांच्या खिशात थोडा कापूस आणि आयोडीनची बाटली असायची.


समाजाच्या उपयोगी पडावं हा रा.प.देसाई यांचा तेव्हापासूनचा स्वभाव त्यामुळे शासकीय नौकरी सांभाळून त्यांनी अनेक वर्षे होमगार्ड्स मध्येसुद्धा अधिकारी म्हणून काम केले. दंगली सारख्या नाजूक प्रसंगात आवश्यकता लक्षात घेऊन स्वत:चा जीव धोक्यात घालून वाहन चालक म्हणूनही आवश्यक त्या ठिकाणी कुमक घेऊन जाण्याचे काम त्यांनी केले होते. ससून रुग्णालयातील नेत्रपेढीचे काम असो किंवा रक्तपेढीचे असो, देसाई सर सहकुटुंब या कामात सक्रीय होते. ५० वेळा स्वत: आणि कुटुंबियांचे मिळून १०० वेळा रक्तदान करणारं हे एकमेव कुटुंब ससून रक्तपेढीत होते. शासकीय नोकरी ती ही अधिकारी म्हणून जबाबदारीची असूनही ती चोख बजावत देसाई सर सामाजिक कामांसाठी अक्षरश: वाहून घेतलेलं व्यक्तिमत्व होतं. शिक्षा पूर्ण करून बाहेर पडणाऱ्या कैद्यांच्या पुनर्वसनाचे काम पहाणाऱ्या संस्थेचेही ते काम करायचे

या कामात त्यांनी अट्टल दरोडेखोरामधील सुद्धा माणूस जागा केल्याचे अनुभव आहेत.

'स्व'–रूपवर्धिनीचे कार्यवाह महणून त्यांनी केलेले काम खूप मोलाचे आहे. दोन दृष्टीनी हे काम अत्यंत महत्त्वाचे होते. एक म्हणजे संस्थेला स्वत:ची अशी जागा नव्हती त्यामुळे संस्थेचा पत्रव्यवहार करणं तो सांभाळण ही सोपी गोष्ट नव्हती. पण त्यांनी कामाच्या परिसरात आपल्या माणसं जोडण्याच्या कलेतून घरे जोडली व त्यातून वर्धिनीचे कार्यालय खाजगी घरांमध्ये थाटले गेले. ज्यांच्या ज्यांच्या घरात वर्धिनीचा संसार होता त्या प्रत्येक घराला तो अभिमानाचा वाटायचा. हे श्रेय रा.प.देसाई यांचेच.

दुसरी गोष्ट म्हणजे काम सुरु झाल्यावर रोजची संध्याकाळी जी शाखा मंगळवार पेठेत भरायची. ती वेळेवर सुरु होण्यामध्ये देसाई सरांच मोलाचं योगदान आहे. शाखा सुरु होण्याच्या वेळेआधी किमान पाच मिनिटे आधी ते मैदानावर उभे असायचे त्यामुळे त्यावेळच्या वर्धकानाही शाखेत वेळेवर येण्याची शिस्त लागली. मैदानच्या शिस्तीबरोबर त्यांनी ज्या ज्या घरांमध्ये संपर्क केला, त्या त्या घरातील पालकांनाही अनेक गोष्टी ते सांगू शकायचे, त्यातून काही पालकांच्या वाईट सवयी बदलल्या. आज ज्याला समुपदेशन म्हणतात आणि त्याची गरज किती आहे हे आवर्जून सांगितले जाते, हेच समुपदेशन देसाई सर सहज गप्पातून करायचे आणि त्यामुळे मुलांचं वर्तन सुधारण असो किंवा त्यांच्या खाण्या पिण्याच्या सवयीत बदल घडणं असो, या गोष्टी सहज घडून यायच्या. वर्धिनीची मुख्य इमारत ज्या जागेवर उभी आहे ती संबंधित व्यक्तीकडून मिळेपर्यंत त्यांनी ज्या पद्धतीने संपर्क केला, संवाद साधला तो विलक्षण होता. वयपरत्वे वर्धिनीचे काम करणे अवघड झाले त्या टप्प्यावर ठरवून वृद्धाश्रमात राहून वृद्धांसाठी त्यांनी केलेले काम, राबवलेले उपक्रम फारच मोलाचे ठाले. काहीच करता येत नाही अशा शारीरिक अवस्थेत सुद्धा त्यांनी केलेल्या कलात्मक वस्तू हा आनंदाने कसं जगावं याचाच वस्तुपाठ होता.

## संस्थापक सदस्य :
# कै. कृष्णाजी गोविंद तथा राजाभाऊ लवळेकर



संत तुकाराम महाराजांनी संतांचे वर्णन 'ऐसी कळवळ्याची जाती, करी लाभाविण प्रीती' असे केले आहे. राजाभाऊ या वर्णनाला साजेसं असं व्यक्तिमत्त्व होतं. राजाभाऊ मूळचे आळंदी जवळच्या चर्होली बुद्रुकचे. शालेय शिक्षणानंतर पुढच्या शिक्षणासाठी राजाभाऊ पुण्यात आले परंतू घरच्या परिस्थितीमुळे डे.ए.सोसायटीच्या नवीन मराठी शाळेत लेखनिक म्हणून नौकरीला लागले. घरच्या जबाबदाऱ्या सांभाळत पदवीधर झाले आणि बी.एड. होऊन त्याच संस्थेत शिक्षक म्हणून काम करू लागले. रा.स्व.संघाच्या कामामुळे मुळातच मुलांशी संवाद करण्याचे कौशल्य होतेच, त्यामुळे शिक्षक म्हणून काम करू लागल्यावर अल्पावधीतच विद्यार्थीप्रिय शिक्षक झाले. अभ्यासक्रमातील विषयांच्या पलीकडे जावून प्रत्येकाशी त्यांचा जो आत्मियतेचा संपर्क होता त्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांचे जीवन उजळले. रमणबाग प्रशालेचे मुख्याध्यापक म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक उपक्रम सुरु केले. आज नाट्य-चित्रपट सृष्टीपासून उद्योग व्यवसायासारख्या जीवनाला स्पर्श करणाऱ्या अनेक क्षेत्रात त्यांचे विद्यार्थी आपल्या कर्तृत्त्वाचा ठसा उमटवत आहेत.

'स्व'-रूपवर्धिनी स्थापन होण्यापूर्वीपासून त्यांचे आणि किशाभाऊ पटवर्धन सरांचे अशा स्वरूपाचे काम सुरु करण्याबाबत अनेकदा बोलणे होत होते. समाजातील गुणी आणि गरजू मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दोघेही आपापल्या शाळांमधून आटोकाट प्रयत्न करीत होते, तरी त्यांना समाधान मिळत नव्हते कारण शाळेच्या चौकटीपलीकडे जावून खूप काही

करणे आवशयक होते. किशाभाऊ निवृत्त झाल्यावर या अस्वस्थतेला आकार मिळाला आणि त्यातून 'स्व'–रुपवर्धीनीचे काम सुरु झाले.

अत्यंत वेगळी पण आशयपूर्ण अशी वर्धिनीची प्रार्थना जन्माला येण्यात राजाभाऊंचाही फार मोलाचा वाटा आहे. अत्यंत संघटन कुशलता असलेल्या राजाभाऊंचे बोलणे अत्यंत प्रेरणादायी असे. त्यांच्या बोलण्यातून आत्मीयतेचा ओलावा झिरपे. विचारही स्पष्ट आणि उच्चारही स्पष्ट पण त्यांच्या संवाद कौशल्यामुळे त्यांच्यासमोर विरोध करणारी व्यक्ती सुद्धा मऊ होऊन जात असायची. या त्यांच्या कौशल्यामुळे केवळ 'स्व'–रूपवर्धिनीच नाहीतर अनेक संस्था संघटनांचे ते आधारवड होते. रा.स्व.संघाच्या पुणे महानगराचे कार्यवाह म्हणून त्यांनी काही वर्षे काम केले होते. संस्कार भारती, भारतीय स्त्री शक्ती जागरण अशा अखिल भारतीय पातळीवर आज असलेल्या संस्थांच्या उभारणीत त्यांचे मोलाचे योगदान आहे. शिक्षण प्रसारक मंडळी सारख्या मोठ्या शैक्षणिक संस्थेचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काही वर्षे काम पाहिले. दैनिक तरुण भारतचे काम असो किंवा ज्ञानदा प्रशालेचे काम असो, शिक्षक संघटनेचे काम असो किंवा एखाद्या कर्मचाऱ्याच्या, एखाद्या कार्यकर्त्याच्या घरचा प्रश्न असो, राजाभाऊ सर्वांना आधार वाटायचे.

वर्धिनीचे काम आकाराला येत असताना त्याची वैचारिक मांडणी, कार्यपद्धती विकसित करण्यात राजाभाऊंनी केलेले काम दिशादर्शक आहे. कार्याध्यक्ष पदावरून किशाभाऊ पटवर्धन सरांनी निवृत्ती स्वीकारल्यावर त्या पदाची जबाबदारी त्यांच्याकडे येणे अपेक्षितच होते आणि कार्याध्यक्ष म्हणूनही त्यांनी वर्धिनीच्या कामाला जो आकार दिला, गती दिली, विचारांची बैठक दिली, त्यातून वर्धिनीचे काम अधिक प्रगल्भ झाले. आज समाजाच्या त्यामुळेच कदाचित वर्धिनीकडून अपेक्षा वाढत आहेत असा अनुभव येतो आहे.

## संस्थापक सदस्य :

# श्री दत्तात्रय लक्ष्मणराव तथा दत्तोबा तांबे



दत्तोबा तांबे मूळचे पुणे जिल्ह्यातील जुन्नरचे. दत्तोबाना दोन भाऊ आणि एक बहिण होती. भावंडात जरी लहान होते तरी दत्तोबांचे व्यक्तिमत्त्व असे होते की घरातील कर्तेपण त्यांच्याकडेच आले. छोट्या गावात आपली फार प्रगती होणार नाही हे त्यांना जाणवले आणि म्हणून आपली प्रगती करण्यासाठी ते पुण्याला आले. पुण्यात स्थिर होण्यापूर्वी त्यांनी मुंबईमध्ये फळांचा व्यवसाय करण्याचा प्रयत्न केला पण काही अडचणी आल्या. त्यामुळे ते पुण्याला परतले. पुण्यात आले ते मंगळवार पेठेत आणि तेथेच कायमचे राहिले. घरच्या जबाबदारीमुळे त्यांचे स्वत:चे शिक्षण फार झाले नाही परंतु आपल्या दोन भावाना मात्र त्यांनी त्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक ते सर्व साह्य केले. त्यामुळे दोघेही भाऊ शिकून चांगल्या नोकरीला लागले.

दत्तोबांच्या मनात व्यवसाय करण्याचा विचार पक्का होता त्यामुळे मुंबईत जरी जम बसला नाही तरी पुण्यात त्यांनी दुधाचा व्यवसाय सुरु केला. हा व्यवसाय हळू हळू वाढत १०० जनावरांचा मोठा गोठा उभा राहिला. या व्यवसायात असल्याने कडबाकुट्टी व्यवसायाची ओळख झाली आणि त्याही व्यवसायाकडे ते वळाले. या व्यवसायातील अन्य व्यावसायिकांच्या ओळखी झाल्या त्यातून समविचारी मित्र एकत्र आले आणि १९६८ साली पुणे कडबाकुट्टी कारखानदार संघ प्रा.लिमिटेड ही कंपनी स्थापन झाली. या मार्फत मंगळवार पेठेत वजनकाटा उभा राहिला आणि अनेक व्यावसायिकांची सोय झाली. कडबाकुट्टी कारखानदार संघाचे काही काळ ते अध्यक्षही होते. वर्धिनीचे संस्थापक उपाध्यक्ष अण्णासाहेब


गोगावले आणि सदस्य कांचनभाई शाह हे सुद्धा त्यांच्याबरोबर या संस्थेचे पदाधिकारी होते. या संस्थेने मंगळवार पेठेतील, विशेषत: गाडीतळ झोपडपट्टीतील परीस्थिती लक्षात घेऊन अनेक सामाजिक उपक्रम सुरु केले. त्यात शिवजयंती, गणेशोत्सव, पंढरीच्या वारीतील वारकऱ्यांची सेवा असे अनेक उपक्रम होते. गरजू नागरिकांसाठी त्यांनी सुरु केलेला दवाखाना खूप महत्त्वाचा ठरला. कोणतेही शुल्क न आकारता लोकांना आरोग्याची चांगली सेवा मिळत होती.

पुणे कडबाकुट्टी कारखानदार संघाचे हे पदाधिकारी म्हणजे एक कुटुंब होते आणि दत्तोबा त्यातील एक महत्त्वाचे सदस्य होते. दत्तोबांना धर्म आणि संस्कृतीचा विलक्षण अभिमान होता. दत्तोबांचा स्वभाव असा होता की संतापलेला माणूसही त्यांच्यासमोर शांत होऊन जायचा आणि एकदा एखादा माणूस जोडला की तो कायमचा त्यांचा होऊन जायचा.

१९२४ साली जन्म झालेल्या दत्तोबाना तसे आयुष्य खूप मोठे लाभले नाही कारण १९८२ साली अल्प आजाराचे निमित्त होऊन ते निवर्तले पण शेवट पर्यंत त्यांचे सामाजिक काम चालूच होते.

'स्व'–रुपवर्धिनीची स्थापना झाली तेव्हा मंगळवार पेठेतच काम सुरु झाले आणि त्या वेळेला दत्तोबांनी शक्य ते सर्व साह्य या कामाला केले. १९८१ साली जेव्हा पुणे महानगरपालिकेने टागोर विद्यानिकेतन शाळा वापरू देण्यास अचानक नकार दिला तेव्हा पुणे कडबाकुट्टी संघाने त्यांच्या कार्यालायची जागा अभ्यास तास घ्यायला तर वजनकाट्याभोवतीची जागा मुलांना खेळायला त्याच दिवशी उपलब्ध करून दिली. त्यामध्ये दत्तोबा यांनी पुढाकार घेतला होता. आज चाळीस वर्षानंतर वर्धिनीची झालेली वाटचाल पाहत असताना इथपर्यंतच्या प्रवासात दत्तोबांसारख्या जाणत्या व्यक्तींची मिळालेली साथ अनमोल होती हे प्रकर्षाने जाणवतं.

## संस्थापक सदस्य :
# श्री.कांचनभाई गिरीधर शाह



तळेगावचे शाह कुटुंब एक अत्यंत आगळं वेगळं कुटुंब म्हणावे लागेल. शाह घराणे मुळचे गुजरातमधील मेहसाना जिल्ह्यातील सिद्धपुर गावचे. सहा सात पिढ्यांपूर्वी केव्हातरी शाहू महाराजांच्या काळात त्यांचे पूर्वज तळेगावात आले आणि तेव्हापासून हे घराणे तळेगावचेच झाले. कारण या कुटुंबातील सर्वजण कोणत्या ना कोणत्या सामाजिक क्षेत्रात सक्रीय राहिले आहेत. कांचनभाई यांचे मोठे बंधू घनश्यामभाई यांनी तर डॉक्टर हेडगेवार यांचेकडूनच संघ स्वयंसेवक होण्यासाठीची प्रतिज्ञा घेतली. या सर्वांच्या सामाजिक सहभागाचे मुळ या एकाच गोष्टीत होते ते म्हणजे हे संपूर्ण कुटुंब रा. स्व. संघाशी समरस झालेले आहे. घनश्यामभाई पुढे मुंबईला गेले आणि तेथे संघाच्या कामात रमले. दुसरे भाऊ रमणभाई तर भारतीय मजदूर संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून काम करू लागले व ते पुढे या संघटनेचे अखिल भारतीय प्रमुख म्हणूनही अनेक वर्षे कार्यरत होते. पुतणे सुरेशभाई काही वर्षे जसे तळेगावचे नगराध्यक्ष होते तसेच  अनेक वर्षे तळेगावचे संघचालकही होते.

स्वभावाने अत्यंत मृदू असलेल्या कांचनभाई यांनी मावळामध्ये संघकाम वाढवण्यासाठी अक्षरश: पायपीट केली. मावळातील एकही गाव असे नाही जिथे कांचनभाईनी संपर्क केला नाही. त्या काळी त्यांनी सुमारे ६३ गावी संघ शाखा सुरु केल्या. पुढे त्यांच्याकडे मावळामध्ये जनसंघाचे काम रुजवण्याची जबाबदारी आली. कांचनभाईनी किती काम केले, प्रवास केला याचा हिशेब सांगताना एका ज्येष्ठ कार्यकर्त्याने असे म्हटले की जेव्हा तळेगावची लोकसंख्या ६ ते ७ हजार होती तेव्हा

त्यांनी किमान ४०० ते ५०० तरुणांना सामाजिक आणि राष्ट्रीय कार्यात सक्रीय केले. सुरुवातीला जनसंघ आणि नंतर भारतीय जनता पक्षाचे दीर्घ काळ काम केलेल्या कांचनभाईच्या मेहनतीमुळे आमदार, नगरसेवक किंवा नगराध्यक्षही निवडून आले पण कांचनभाईनी कधीही कोणतेही पद स्वीकारले नाही. किशाभाऊ पटवर्धन सर त्यांचे वर्णन नेमक्या शब्दात केले आहे. ते म्हणायचे कांचनभाई सर्वार्थाने कांचन ही आहेत आणि भाईही अवघ्या विसाव्या वर्षी त्यांचे लग्न झाले त्यामुळे संसार चालवण्यासाठी त्यांनी व्यवसायाची वाट धरली. सुरुवातीला पिठाची गिरणी, मग तांदुळाची. पुढे जावून काही काळ कातकरी समाजासारख्या वनवासी लोकांना मदत होईल या हेतूने हिरडा–बेहडा याचा व्यापार असे करीत करीत पुढे पशु खाद्य म्हणून लागणाऱ्या कडबाकुट्टीचा व्यवसाय थाटला. या प्रत्येक टप्प्यावर अनेक अडचणी आल्या, कधी नुकसान झाले. पण यातून पुढे जात आणि आपल्याबरोबर श्रमिक वर्गाला पुढे घेऊन जाण्याचे त्यांचे व्रत कायम राहिले. यातूनच कडबाकुट्टी वाहून आणणाऱ्या ट्रक चालवणाऱ्या सामान्य ड्रायव्हरना त्यांनी ट्रकचे मालक केले, दरमहा १२ रुपये भाडे देऊन हातगाडी ओढणाऱ्या पंचवीस गरीब हमालांना एकत्र करून त्यांना त्यांच्या मालकीची हातगाडी घेऊन दिली आणि त्यांना सुखाच्या वाटेवर आणले असे कितीतरी उपक्रम त्यानी कोणतीही प्रसिद्धी न करता केले. त्यांच्याच संघटन कुशलतेमुळे जशी तळेगाव नगरपालिकेची निवडणूक चार वेळा बिनविरोध होऊ शकली तशी सामाजिक क्षेत्रात कडबाकुट्टी कारखानदार संघासारख्या संस्थांची बांधणी करून त्यातून अनेक सामाजिक उपक्रम राबवले. पण प्रत्येकवेळी प्रसिद्धीपासून ते दूर राहिले. कांचनभाईनी कितीजणांना मोठे केले, किती जणांची कामे केली याची मोजदादच करता येत नाही पण या कामाचे श्रेय त्यांनी स्वत:कडे कधीच घेतले नाही.  मी करता ऐसे म्हणसी, तेणे तू कष्टी होसी। राम कर्ता म्हणता पावसीयाशी कीर्ती प्रताप।। दासबोधात संत रामदासांनी केलेले हे वर्णन कांचनभाईना लागू पडते असेच हे व्यक्तिमत्त्व होते.

# संस्थापक सदस्य :

# श्री.वालचंद देवीचंद संचेती



कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या राजा धनराज गिरजी विद्यालायातून शालेय शिक्षण पूर्ण झाले. याच कारणाने विद्यार्थी म्हणून त्यांचा किशाभाऊ पटवर्धन यांच्याशी संपर्क आला. शिक्षणानंतर व्यापार क्षेत्रात खूप मेहनत घेऊन वालचंदजींनी स्वत:चे नांव आणि स्थान निर्माण केले. शिक्षणानंतर व्यवसायात असतानाही त्यांचा पटवर्धन सरांशी निकटचा संपर्क होता आणि त्यामुळे आपल्याच शिक्षकांनी सुरु केलेल्या 'स्व'–रूपवर्धिनी संस्थेशी ते संथापक सदस्य म्हणून जोडले गेले. वालचंद संचेती पूना मर्चंट चेंबरचे अनेक वर्षांपासून पदाधिकारी आहेत. मार्केट यार्ड येथील व्यापार भवन बांधण्यात त्यांचा मोलाचा सहभाग होता. शहरातील बाजार पेठेत, जड वाहन वाहतूक बंदी विरोधात, त्यांनी आंदोलने केली आहेत. जकात, एलबीटी याविषयी ठाम भूमिका घेऊन व्यापाऱ्यांच्या वतीने लढा दिला आहे. संचेती सामाजिक कार्यामध्येही कार्यरत आहेत. 'ओसवाल बंधू समाज' या संस्थेचे ते अध्यक्ष आहेत.

कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या कामात संस्थेचे पदाधिकारी म्हणून ते अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. २००८ पासून कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. या संस्थेच्या वाढत्या व्यापामुळे गेल्या काही वर्षांपासून 'स्व'–रूपवर्धिनीच्या कामात मात्र ते आता सक्रीय राहू शकत नाहीत.

# किशाभाऊंचे सहकारी

'स्व'–रुपवर्धिनीची स्थापना होत असताना किशाभाऊ पटवर्धन सर आणि राजाभाऊ लवळेकर सर अनेकांना भेटत होते, त्यांच्याशी बोलत होते.

अशा अनेक औपचारिक/अनौपचारिक गप्पा आणि बैठकांमधून वर्धिनीचे काम साकार झाले, त्याचे कार्यपद्धती विकसित झाली. यातील काहीजण संस्थापक सदस्य म्हणून काम करू लागले, काहीजण नंतर संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे सदस्य झाले पण अनेकजण असे होते की त्यांनी काम तर सुरुवातीपासून केलं पण संस्थेच्या विश्वस्त मंडळावर किंवा अन्य कोणत्या पदावर नियुक्तीची अपेक्षा न ठेवता शक्य असेल ते सर्व काम अत्यंत मन:पूर्वक केलं कारण या सर्वांच्या मनात समाजातील कमकुवत घटकाविषयी आणि त्यातही अशा परिस्थितीत राहणाऱ्या मुला मुलींच्या विषयी आत्मीयता होती. अशा काही सहकाऱ्यांचा हा परिचय :–

# श्री वसंत नारायण दाते



डिफेन्स अकाउंटस मध्ये वरिष्ठ अधिकारी असलेले वसंतराव दाते हे किशाभाऊ पटवर्धन सरांचे संघातील सहकारी. दोघांनी स्वयंसेवक या नात्याने शाखेचे काम अनेक वर्षे एकत्रपणे केलं होतं. दोघेही परस्परांना एकेरी नावाने हाक मारायचे आणि वय विसरून एकमेकांची थट्टा–मस्करी करावी इतकी त्यांची जवळीक होती. वर्धीनीचे काम सुरु झाले तेव्हा वसंतराव दाते यांची नोकरी चालू होती पण १९८१ मध्ये ते निवृत्त झाले आणि पटवर्धन सरांनी त्यांना सांगितले की संस्थेच्या अकौंटसची जबाबदारी आता तुझी. ते कसं करायचं तू ठरव. एवढ्यावरच हे थांबले नाही. तू आता निवृत्त झाला आहेस ना? मग घरी बसून काय राहतोस? असं म्हणून वर्धिनीच्या विद्यापीठ परिसरात सुरु होणाऱ्या शाखेची जबाबदारी त्यांच्यावर किशाभाउनी सोपवली.

स्वामी विवेकानंद या नावाने सुरु झालेल्या या शाखेच्या उभारणी साठी आवश्यक ती सर्व कामं दाते सर करू लागले. मग मुलांच्या घरी संपर्क असो, मुलांना एखादा विषय शिकवण असो, नवे कार्यकर्ते जोडणं असो किंवा मुलांना पूरक आहार काय द्यायचा याचा विचार करून तो घेऊन येण असो, सगळी कामे दाते सर करीत होते आणि त्यासाठी स्वत:च्या खर्चानी रोज दहा पंधरा किलोमीटर प्रवास करीत होते. त्यांनी या शाखेला जोडलेल्या अन्य कार्यकर्त्यांच्या सोबत केलेल्या कामाचे दूरगामी परिणाम झालेले पाहायला मिळाले आहेत. आज या शाखेच्या सुरुवातीच्या वर्षात असलेल्या अनेक वर्धकांचे कर्तृत्त्व अशा कार्यकर्त्यांमुळे उजळले आहे. अशीच जबाबदारी पुढे दाते सरांनी स्वामी सुबोधानंद शाखेची घेतली

होती आणि याही शाखेच्या उभारणीत खूप मोलाचे योगदान दिले आहे.

किशाभाउंनी सोपवलेली अकौंटंसची जबाबदारी तर होतीच. १९८८ पर्यंत वर्धिनीला स्वत:ची अशी जागा नव्हती त्यामुळे सगळे हिशेब नोंदवून त्याचा हिशेब तपासणीला देण्यासाठी आवश्यक अशा पद्धतीत लिहिणं, सर्व हिशेब जुळवून तपासणीला देणं हे काम दाते सरानी न कंटाळता ८ वर्षे स्वत:च्या घरी केलं.

१९८१ पासून वर्धिनी पुण्याच्या सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीत सहभाग घेत आहे. मानाच्या चौथ्या गणपती बरोबर म्हणजे तुळशीबाग मंडळाच्या गणेश मिरवणुकीत वर्धिनीची पथकं गेल्या ३५ वर्षाहून अधिक काळ आहेत. या मंडळाबरोबरचं हे नातं दाते सरांमुळे जुळलं आणि या नात्याने वर्धिनीला पुण्यात एक वेगळी ओळखही मिळाली. २००६ साली वृद्धत्वामुळे त्यांचं दुख:द निधन झालं.

**झोपेतही कामाचाच विचार**

एखादी व्यक्ती कामाशी, दिलेल्या जबाबदारीशी किती एकरूप होते याचं हे उदाहरण. मला प्रत्यक्ष हे अनुभवता आलं. दरवर्षी मार्च नंतर त्यांच्या घरी साधारण ८ दिवस मला मुक्काम करण्याची संधी मिळायची. निमित्त असायचं वर्षभराचे हिशेब लिहून काढणं आणि ताळेबंद तयार करण्यापर्यंतच सगळं काम पूर्ण करणं. एकदा या हिशेबाचे काम ५/– रुपयांच्या फरकामुळे अडले. दोघांनीही खूप खटपट करीत फरक कुठे असेल याचा शोध घ्यायचा प्रयत्न केला. पण चूक सापडेना. रात्री जेवणं झाल्यावर आम्ही झोपलो. पहाटे ३.०० वाजता दाते सरांनी उठवलं आणि म्हणाले अमूक अमूक महिन्यात एक बँक कमिशन पडले आहे. त्याची एन्ट्री राहिली आहे. तिथेच चूक आहे हे लक्षात आलं आणि हिशेब जुळले.

# श्री दिनकर दामोदर उर्फ दि.दा.जोशी



दि.दा. या टोपण नावाने परिचित असलेले जोशी सर हे पुण्याच्या न्यू. इंग्लिश स्कूल, टिळक रोड या शाळेत कला शिक्षक म्हणून कार्यरत होते. कला शिक्षक असले तरी केवळ चित्रकला शिकवणारे शिक्षक म्हणून त्यांची ओळख नव्हती तर किशाभाऊ पटवर्धन सरांप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये मिसळणारे, त्यांच्यातील गुणांची पारख करणारे, आवश्यक असेल तेव्हा कान ओढून आणि परिस्थिती पाहून पाठीवर आधाराचा हात ठेवणारे असे हे विद्यार्थी प्रिय शिक्षक होते. विद्यार्थ्यांनी रोज मैदानावर घाम गाळलाच पाहिजे असा त्याचा आग्रह असे त्यामुळे शाळा सुटल्यावर मैदानावर हॉकी फुटबॉल असे खेळ सुरु करण्यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली होती. दि.दा.जोशी सर शाळेत आणखीन एक उपक्रम करायचे हे करून पहा. ओरिगामी च्या माध्यमातून भौमितिक आकारामधून निर्माण होणाऱ्या कलाकृती ते काच फलकात लावायचे आणि विद्यार्थ्यांना गोडी लावायचे. क्रांतिकारक कथा ऐकावी तर दि.दा.जोशी सरांकडून. कथा सांगताना ते स्वत:हि एकरूप व्हायचे आणि ऐकणारे विद्यार्थी सुद्धा. विद्यार्थ्यांसाठी एवढा वेळ देणारे दि.दा. शिक्षक संघटनेतही तितकेच सक्रीय होते. वर्षानुवर्षे या संघटनेचे काम त्यांनी केले पण त्याचे पदाधिकारी कधीच झाले नाहीत. पदावर न जाताही काम कसं करावं याचे दि.दा. हे मूर्तिमंत उदाहरण होते.

ते बिबवेवाडी परिसरात राह्यला गेले त्याच सुमारास बिबवेवाडी भागात पुणे महानगर पालिकेने गरीब लोकांसाठी इंदिरानगर भागात गाळे बांधून

दिले होते. येथे रहायला येणाऱ्या पालकांच्या मुलांसाठी वर्धिनीची शाखा सुरु करावी असा विचार झाला आणि ती जबाबदारी दि.दा.जोशी सरांनी स्वीकारली. पुढे इंदिरानगर ऐवजी जोशी सरांच्या घराच्या मागील बाजूला असणाऱ्या महानगर पालिकेच्या शाळेतच ही शाखा सुरु झाली. या शाखेचे सर्व अर्थाने दि.दा. हे पालक होते. दाते सरांप्रमाणे या शाखेच्या उभारणीसाठी त्यांनी अमाप कष्ट घेतले. त्यांचे घर हे त्या भागातील वर्धीनीचे कार्यालय होते. वर्धक सुद्धा त्यांच्या घरी वेळ न पाहता केव्हाही जायचे. जोशी सरांमुळे त्यांची ज्येष्ठ कन्या उज्ज्वलाही हळू हळू या काम ात सहभागी होऊ लागली आणि पुढे जावून तर तिने एक वर्ष वर्धिनीची पूर्ण वेळ कार्यकर्ती म्हणून कामही केले.

अनेक वर्षे दि.दा. सायकल चालवतच सर्व कामे करीत होते. पुढे स्वयंचलित दुचाकी वाहन त्यांनी घेतले पण वयाच्या एका टप्प्यावर प्रकृती अस्वास्थ्यामुळे हळू हळू त्यांचे फिरणे कमी होऊ लागले आणि साली त्यांचे दु:खद निधन झाले.

**आईवडिलांनंतर फक्त यांनाच माझा कान धरण्याचा अधिकार आहे.**

दि.दा. शाळा सुटल्यावर नेहमीच्या रस्त्याने सायकलवर घरी चालले होते. अचानक एका चौकात ते पुढे गेल्यावर पोलिस मागे आला आणि म्हणाला ''तुमहाला चौकीत बोलावले आहे. दि.दां ना समजेना आपलं काय चुकलयं. साशंक नजरेने पोलिस चौकीत पाहोचले. समोर पाहातात तर काय? ज्याला शाळेत अनेकदा बदडलंय असा त्यांचा माजी विद्यार्थी आणि आता प्रतिथयश वकील. हा 'वकील' विद्यार्थी तेथील अधिकाऱ्यांना म्हणाला, हे माझे सर. भर चौकात माझा कान धरण्याचा अधिकार माझ्या आई वडीलांनंतर केवळ यांनाच आहे.

# श्री.रघुनाथ जगन्नाथ उर्फ र.ज.नरवणे सर



र.ज.नरवणे सरांचा जन्म पुण्यातीलच एका मध्यमवर्गीय कुटुंबातला. र.ज.दहा वर्षाचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. घरी त्यांना नाना म्हणतात. शालेय शिक्षण भावे हायस्कूल (आताची विमलाबाई गरवारे प्रशाला) आणि नु.म.विद्यालयातून तर महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन महाविद्यालयात झाले. सिंगलबार डबलबार या जिम्नॅस्टिक्स प्रकारात जिल्हा पातळीवरचे ते विजेते होते तर पोहण्याची त्यांना जी आवड जडली ती आज वयाच्या ८५व्या वर्षापर्यंत टिकून होती. चालायला त्रास होतो पण रोजचे पोहणे थांबले नाही. पट्टीचे पोहणारे असल्याने पुण्याच्या प्रसिद्ध पानशेत प्रलयाच्या वेळी त्या पुराच्या पाण्यात पुण्याच्या प्रसिद्ध लकडी पुलावरून उडी मारून ओमकारेश्वर मंदिरापर्यंत पोहत जाण्याचा त्यांचा रोजचा कार्यक्रम त्या काळात झाला होता.

मैदान गाजवणारे नाना सांस्कृतिक आणि संगीत क्षेत्रातही सहज वावरणारे आहेत. महाविद्यालयीन काळात सांस्कृतिक कट्टा त्यांनी गाजवला तर संवादिनी, बासरी, सतार आणि व्हायोलीन वादनातहि ते निपुण आहेत. याच हातातून उत्तम निसर्गचित्रे आणि व्यक्तिरेखा चितारली जातात आणि त्याच प्रचीती त्यांच्या घरात गेल्यावर येते.

एम.ए.बी.एड शिक्षण पूर्ण झाल्यावर नरवणे मुरबाड(कल्याण) येथील शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाले पण लवकरच पुण्याला परतले आणि १९६० मध्ये रविवार पेठेतील भारत इंग्लिश स्कूल (शेठ हिरालाल सराफ

प्रशाला) मध्ये शिक्षक म्हणून रुजू झाले. या संस्थेतूनच ते १९८९ साली मुख्याध्यापक पदावरून निवृत्त झाले.  त्यांच्या व्यक्तिमत्त्वच असे आहे की या शाळेत ते अल्पवधीतच विद्यार्थीप्रिय झाले. विद्यार्थ्यांना क्रीडा विषयात, कला विषयात सांस्कृतिक विषयात ते सततच प्रोत्साहन देत राहिले. मे महिन्याच्या सुटीत आपल्या विद्यार्थ्यांना पोहायला शिकवणे हा त्यांचा आवडता कार्यक्रम असे.

एक चांगला शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जे जे करू शकतो ते ते सर्व उपक्रम, कार्यक्रम त्यांनी निवृत्त होई पर्यंत केले. पण शिक्षक ही एक वृत्ती आहे आणि त्यामुळे निवृत्तीनंतर सुद्धा ते स्वस्थ कसे राहतील.? 'स्व'-रुपवार्धिनीच्या स्थापनेपासून या कामाशी ते जोडलेले होतेच पण निवृत्तीनंतर अधिक वेळ देऊन लक्ष घालू लागले. स्वामी विवेकानंद आणि स्वामी सुबोधानंद या दोन शाखांचे पालक म्हणून त्यांनी काही वर्षे काम पाहिले. प्रेरणादायी कविता, लेख, निबंध आणि पुस्तके आपल्या संपर्कातील विद्यार्थ्यांना देण्यात त्यांना विलक्षण आनंद मिळतो. त्यामुळे आजही नवं काही वाचलं ते आवडलं की वर्धिनीच्या शाखांचे काम पाहणाऱ्या कार्यकर्त्यांपर्यंत ते पोहचवतात.

वर्धिनीच्या दृष्टीने किशाभाऊ, राजाभाऊ आणि अन्य ज्येष्ठ कार्यकर्त्यांशी संवाद करून त्यांनी 'स्व'-रुपवर्धीनीला ज्या गुणवत्तेचे वर्धक वर्धिका घडवायच्या आहेत त्या तशा घडाव्यात यासाठी उपयुक्त असा सर्वांगीण विकास साधू शकणारा वर्धिनीचा एक स्वतंत्र इयत्ताश: अभ्यासक्रम त्यांनी खूप तयार केला. वर्धिनीच्या कामात त्याचा अतिशय उपयोग होतो आहे.

वयाच्या ८७ व्या वर्षी त्यांनी कुमार वयीन मुला-मुलींसाठी एक कादंबरी लिहिण्यासाठी घेतली आणि एक वर्ष त्यावर काम करीत 'नवी पहाट' या नावाने हि कादंबरी २०१९ साली भारतीय विचार साधनेने प्रसिद्ध सुद्धा केली आहे. नव्वदाव्या वर्षी त्यांनी दुसरी कादंबरी लिहीली असून छपाईच्या प्रतिक्षेत आहे.

# श्रीमती कुंतला मुजुमदार



१९८१ची गोष्ट आहे. मुंबई दूरदर्शन वरून 'स्व'–रूपवर्धिनी संस्थेचे संस्थापक, अन्य कार्यकर्ते आणि संस्थेच्या छोट्या विद्यार्थ्यांच्या मुलाखतीचा एक कार्यक्रम प्रसारित झाला होता. तो कार्यक्रम पाहणाऱ्या कुन्तिताई मुजुमदार यांना त्या समुहात त्या ओळखत असलेली एक व्यक्ती दिसली; रा.प.देसाई. ससून रुग्णालयातील नेत्रपेढीच्या कामाच्या निमित्ताने त्या देसाई सरांना ओळखत होत्या. मुलाखत ऐकल्यावर त्यांनी दुसऱ्या दिवशी देसाई सरांना त्यांनी फोन केला आणि म्हणाल्या ''देसाई सर तुम्ही जसे मंगळवार पेठेत मुलांसाठी काम करीत आहात ना, तसं काम मलाही करायचं आहे वडारवाडी भागातील मुलांसाठी. मला या कामासाठी 'स्व'–रुपवर्धिनीची काही मदत मिळेल का?''

त्यांच्या या अपेक्षेमुळे त्यांची २–३ दिवसांनी किशाभाऊ पटवर्धन सर यांच्याशी भेट झाली. किशाभाऊ त्यांना म्हणाले आम्ही तुम्हाला हवी ती मदत देऊ कारण असं काम अनेक ठिकाणी होण्याची आवश्यकता आहे. तुमची जर कोणती संस्था असेल तर त्या मार्फत तुम्ही सुरु करा आम्ही तुमच्या बरोबर असूच. जर तुमची वेगळी कोणती संस्था नसेल आणि 'स्व'–रुपवर्धीनिचेच म्हणून हे काम आपण पाहणार असलात तर त्यालाही आमची तयारी आहे. पुढे या संदर्भात काही भेटी झाल्या आणि वसंतराव दाते आणि कुन्तिताई मुजुमदार अशा दोघांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी विवेकानंद शाखेचे काम सुरु झाले.

आत्तापर्यंत अशा प्रकारे त्यांनी काम केलेले नव्हते पण त्यांची इतकी

तळमळ होती की काम काय करायचं. कसं करायचं हे वेगळ त्यांना कधी सांगाव लागलच नाही. पूर्ण समरस होऊन त्या काम करू लागल्या. समाजामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तीशी परिचय होता. अशी वेगवेगळी माणसे मुलांना भेटू लागली, त्यांच्यासाठी काही उपक्रम करू लागली.


कुन्तिताई पाहता पाहता वर्धिनीच्या कार्यकारिणी सदस्यही झाल्या आणि १९८८ नंतर जेव्हा बालवाडी आणि त्यातून महिलांसाठी वेगवेगळे उपक्रम सुरु झाले, या सर्व विभागाच्या प्रमुख म्हणून त्यांनी जबाबदारी स्वीकारली आणि या शारदामणी विभागाला एक स्वतंत्र ओळख मिळवून दिली. त्या कामातून आज सुमारे ५००० गरुजू मुली व महिला स्वत:च्या पायावर उभ्या राहिल्या आहेत.

घरात आलेल्या काही अडचणींमुळे, आजारपणामुळे आणि वयपरत्वे आज त्या सक्रीय नाहीत पण त्यांच्या योगदानामुळे वर्धिनीचे काम अनेक अंगानी विस्तारले आहे.

**पूरक आहाराला आईच्या हातांची चव?**

वर्धिनीच्या शाखेवर आठवड्यातून एकदा पूरक आहार दिला जात होता. पूरक आहार ठरलेला होता. उकडून मीठ लावून तयार केलेले काबुली चणे. याच काबुली चण्यांना जेव्हा आईच्या हातांच्या स्पर्श झाला तेव्हा या पूरक आहाराची चव ‘अधिक चविष्ट’ झाली. विवेकानंद शाखेचे वर्धक मोठे नशिबवान ठरले. कुंतीताई आणि वासंतीताई बेदरकर या दोघी या उकडलेल्या चण्यांवर लिंबू, खोबरं आणि कोथिंबीरीची पखरण करून चणे अधिक चविष्ट करायच्या. त्यामुळे पूरक आहार कधीच शिल्लक रहायचा नाही. शेवटी आईच्या हाताची चव वेगळी असतेच ना!

# श्री यशवंतराव लेले.



कै.किशाभाऊ पटवर्धन सरांचे संघातील आणि ज्ञानप्रबोधिनीच्या स्थापनेपूर्वीपासूनचे सहकारी. ज्ञान प्रबोधीनीचे कामस्वीकारण्यापूर्वी श्री.यशवंतराव लेले हे न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग या शाळेमध्ये शिक्षक होते. प्रबोधिनीची शाळा सुरु झाल्यावर या प्रशालेचे ते पहिले प्राचार्य होते. ज्ञानतपस्वी असं त्याचं वर्णन करता येईल. प्रचंड वाचन, चिंतन–मनन असणाऱ्या यशवंतराव लेले यांनी जे जे काम हातात घेतलं, त्या त्या कामात त्यांच्या प्रभावी, शिस्तशीर कामाची एक छाप उमटलेली पाहायला मिळते. गेल्या अनेक वर्षांपासून यशवंतराव हे ज्ञानप्रबोधिनीच्या संस्कृत–संस्कृती–संशोधिकेचे काम पाहत आहेत. प्रशालेचे प्राचार्य म्हणून काम पाहिल्यावर काही वर्षे ते प्रबोधिनीच्या खेड शिवापूर येथील ग्राम विकास कामात तेथे राहून लक्ष देत होते. पुढे काही वर्षे ठाणे जिल्ह्यातील सकवार येथे एक्सेल कंपनी तर्फे जे वनवासी बांधवांच्या विकासाचे काम चालू होते त्या कामाची त्यांच्याकडे जबाबदारी होती.

'स्व'–रुपवर्धीनीच्या बाबतीत तर वर्धिनीच्या स्थापनेपूर्वी किशाभाऊंनी ज्या ज्या सहकाऱ्यांबरोबर वर्धिनीच्या कामाचे स्वरूप कसे असावे, संस्थेचे नांव, प्रार्थना, कार्यपद्धती अशा अनेक विषयांवर चर्चा केल्या, त्यात यशवंतराव लेले हे नांव प्राधान्याने लिहावे लागेल. त्यामुळे वर्धिनीच्या स्थापनेपूर्वी पासूनच त्यांचा या कामात सहभाग होता. वर्धिनीचे काम सुरु झाल्यावरही यशवंतराव लेले यांचे मार्गदर्शन कार्यकर्त्यांना आणि वर्धक/युवक युवतींना मिळत होते. ज्ञानप्रबोधिनी मधील युवकांसाठी

त्यांनी प्रचीती नावाचा एक उपक्रम सुरु केला. अनेक विषयांचा युवकांनी अभ्यास करावा, त्यावर सखोल चर्चा व्हावी अशा संकल्पनेतून प्रचीती गटाचे काम रुजले. याच पद्धतीने वर्धिनीचे काम करणाऱ्या युवक युवतींसाठी त्यांनी रविवारच्या बैठकीत अनेक विषय मांडले, मांडायला लावले, अभ्यास करायला दिले. यातून आपण सामाजिक काम करीत असलो तरी चांगले आणि परिणाम साधणारे काम व्हायचे असेल तर अभ्यास किती करावा, कसा करावा याचे नकळत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन मिळत होते. भारता भोवती असलेल्या देशांचा अभ्यास, विकसित देशांचा अभ्यास असे विषय घेऊन एकेकाला त्यांनी एकेका देशाचा अभ्यास करायला सांगितले, त्यासाठी पुस्तके सुचवली, दिली. अशा मार्गदर्शनामुळे कार्यकर्त्यांची सक्षम फळी उभी राहायला खूप मदत झाली. मंगळवार पेठेत वर्धिनीची वास्तू उभी राहिल्यानंतर यशवंतराव लेले यांनी आजोळ या नव्याने सुरु होणाऱ्या प्रकल्पाची जबाबदारी स्वीकारली, त्याची संकल्पना रुजवली आणि हा प्रकल्प पुढे अनेक अर्थानी उपयोगी ठरला. आज वयाच्या नव्वदीनंतरही त्यांचा उत्साह आणि अभ्यासाची वृत्ती भेटणाऱ्या प्रत्येकाला प्रेरणा देत आहे.

## मूकं करोति वाचालम्?

हे वाक्य वेगळ्या अर्थाने डॉ. भीमराव गस्ती यांच्या बाबतीत म्हणता येईल. बेरड समाजासाठी आणि देवदासी प्रथेविरुद्ध प्रचंड काम करणाऱ्या डॉ. भीमराव गस्ती यांना खरी मानसिक ताकद दिली ती मा. यशवंतराव लेले यांनी. डॉ. गस्ती तसे संकोची आणि कमी बोलणारे पण त्यांनी हाती घेतलेलं काम इतक मोठं आणि महत्त्वाचं होतं की त्यासाठी डॉ. गस्ती यांनी संकोच सोडून मोकळे पणाने आपले विचार सम ाजासमोर मांडले पाहिजेत यासाठी लेले सरांनी खूप प्रयत्न केले आणि बदल घडला. डॉ. भीमराव गस्ती आपल्या कामाबद्दल मोकळेपणाने समाजासमोर आपली व्यथा, आपले प्रश्न आणि समाजाकडून काय अपेक्षा आहेत हे मांडू लागले.

# श्री.पुखराजजी जैन (पोरवाल)



पुखराजजी मुळचे राजस्तान मधील सिरोई गावचे. त्यांचे शालेय शिक्षण याच गावात झाले. शाळेत कायम पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या पुखराजजी यांच्या मनात शिक्षणाची इच्छा तीव्र होती पण घरची परिस्थिती मात्र पूर्ण विपरीत त्यामुळे पुढचे शिक्षण करण्याची मनातील इच्छा बाजूला ठेवून घराला आधार देण्यासाठी ते नोकरीच्या शोधात पुण्याला आले. काही काळ राजदूत मोटर्स मध्ये काम केल्यावर मुकुन्दशेठ लोहिया यांच्या बांधकाम प्रकल्पांवर सुपरवायझर म्हणून काम करू लागले. सात आठ वर्षे त्यांच्याकडे काम करीत असतानाच त्यांच्यातील 'व्यावसायिक' जागरुकपणे या व्यवसायाचा अभ्यास करीत होता. निरीक्षण, माणसाना धरून ठेवण्याची हातोटी, स्वभावातील प्रामाणिकपणा, आवश्यक तेवढाच आणि शांतपणे संवाद करण्याची सवय या सगळ्या बळावर पाठीशी अर्थबळ नसतानाही त्यांनी १९८०च्या आसपास स्वत:चा बांधकाम व्यवसाय सुरु केला. काही वर्षातच त्यांनी आपले दोन भाऊ, वडील, आजोबा या सगळ्यांना या व्यवसायात जोडून घेतले आणि एक मोठी टीम पोरवाल बिल्डर्स साठी काम करू लागली.

काही वर्षातच व्यवसायचा व्याप वाढत शेकडो एकर जमिनीचे व्यवहार करणारी, सामान्य माणसांना हक्काचे आणि चांगले घर बांधून देणारी अशी त्यांच्या व्यवसायाची ओळख निर्माण झाली. कष्टाने पैसा जसा मिळवला तसे सामाजिक भानही जपले. त्यांचे दोन भाऊ त्यांच्या बरोबर काम करीत होते त्यातील त्यांच्या पेक्षा वयाने लहान असलेला संदीप या

भावाचे अकस्मात निधन झाले. आपल्या या भावाच्या स्मरणार्थ त्यांनी आपल्या मूळ गावी, सिरोई येथे एक शाळा बांधली. आपल्यासारखी शाळा सोडून देण्याची कुणावर वेळ येऊ नये ही त्यामागची भावना होती. आणि याच भावनेतून त्यांनी वर्धिनीच्या मंगळवार पेठेतील इमारतीचे काम चालू असताना एका खोलीसाठी देणगी दिली पण ते कुणालाही कळू दिले नाही.

श्री.उदयराव गुजर यांच्यामुळे त्यांचा वर्धिनिशी संपर्क आला. गरीब मुला मुलींच्या कल्याणासाठी शिक्षणाच्या माध्यमातून चाललेल्या या कामाशी ते एकरूप झाले नसते तरच नवल. ते संस्थेच्या कार्यकारिणीचे सदस्यही होते. बैठकीत अत्यंत मोजके बोलायचे. पण त्यांनी एखादी गोष्ट स्वीकारली की ते काम झाले म्हणूनच समजावे. आज चऱ्होली येथे संस्थेच्या कामाचा जो विस्तार प्रकल्प उभा राहतो आहे त्यामागे सुद्धा त्यांची दूरदृष्टी आणि चांगल्या कामाला भरभरून मदत करण्याचा त्यांचा स्वभाव फार मोलाचा ठरला आहे. त्यांच्या मागे त्यांचा वारसा चालवणारा जयदीप हा त्यांचा मुलगाही त्याच प्रेरणेने संस्थेशी जोडलेला आहे.

**किती उंचीची माणसं निर्माण होतात हे महत्त्वाचे आहे.**

१९९३ मध्ये मंगळावर पेठेतील इमारतीच्या उर्वरित दोन मजल्यांचे बांधकाम पूर्ण झाले. त्याचे उद्‌घाटन मा. अण्णासाहेब हजारे यांच्या हस्ते झाले होते. याप्रसंगी बोलताना मा. अण्णांनी एक महत्त्वाचा विचार उपस्थित हितचिंतकांसमोर आणि विद्यार्थ्यांसमोर मांडला होता.

ते म्हणाले इमारतीची उंची मोठी आहे यात शंकाच नाही. इमारत देखणी दिसते आहे. मला असं वाटतं इमारत किती उंच आहे यापेक्षा या इमारतीमधून किती उंचीची माणसं निर्माण होतात हे पहाणे महत्त्वाचे आहे. वर्धिनीचं काम पहाणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांनी या गोष्टीवर लक्ष केंद्रित करावं.

# श्री. जयसिंहभाई मरीवाला



उद्योग विश्वामध्ये मरिवाला कुटुंबाचे नांव खूप मोठे आहे. मिरी निर्यातीचा मुळ व्यवसाय. जयसिंहभाई मरिवाला हे सुद्धा उद्योग क्षेत्रात सुरुवातीपासून कार्यरत आहेत. मिरचीच्या बियांपासून तेल तसेच कर्करोगावर औषध म्हणून वापरल्या जाणाऱ्या झेंडूच्या फुलांचा अर्क काढणारे त्यांचे कारखाने कोचीन व पुणे येथे आहेत.

जयसिंहभाई उत्तम चित्रकार आहेत, संगीताचे उत्तम जाणकार आहेत. जंगलात आणी डोंगर दऱ्यात रमणारे आहेत. आज वयाची ८० वर्षे पूर्ण झाल्यावरही हिमालायच्या रांगा आणि डोंगरवाटा त्यांना खुणावतात आणि ते गिरीभ्रमणासाठी अतिशय उत्साहने जातात. मुंबई येथे मोठे निवासस्थान आहे पण त्यांचे मन अधिक रमते ते महाबळेश्वर जवळ माचुतरे गावी त्यांनी बांधलेल्या फार्म हाउसवर. या ठिकाणी ते शेतीमधील अनेक प्रयोग करतात. त्यांच्या यशस्वी प्रयोगांना सातारा जिल्ह्याचे अनेक वर्षे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळत आले आहे. जिल्ह्यातील शेतकरी त्यांचे प्रयोग बघायला आणि मार्गदर्शन घ्यायला येत असतात. अनेक सामाजिक शैक्षणिक संस्थांच्या उभारणीत आणि विस्तारात त्यांचे फार मोठे योगदान आहे. मुंबई मधील भाटीया रूग्णालय आणि महाबळेश्वर जवळील माचुत्रे गावातील शाळा अशी अनेक उदाहरणे आहेत. माचुतरे गावाजवळ एक १०० वर्षे जुने शासकीय रुग्णालय आहे. या रुग्णालयाची अवस्था अतिशय बिकट आहे. या रुग्णालयाचा कायापालट करण्याचे त्यांनी ठरवले आणि अक्षरश: पायाला भिंगरी लावल्यासारखे अनेकांना भेटून, निधी उभा करून मार्च २०20 अखेर ५0 बेडचे अद्यावत


हॉस्पिटल उभे करण्याचा त्यांचा संकल्प त्यांनी पूर्णत्वास वर्धिनीचे अध्यक्ष म्हणून ते अनेक वर्षे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत आले आहेत. काम करताना पुढच्या किमान पाच वर्षांचे नियोजन असले पाहिजे असा त्यांचा कायम आग्रह असतो आणि या नियोजनानुसार अर्थबळ, मनुष्यबळ कसे उभे करावे याविषयी ते नेमकेपणाने मार्गदर्शन करतात. संस्थेच्या आजच्या विस्तारातील त्यांचे योगदान फार मोलाचे आहे.

**फोनची रिंग वाजली की...**

जयसिंगभाई यांच्यातील कलाकाराचे दर्शन घडवणारी त्यांची एक सवय जवळून अनुभवण्याचा योग मला अनेकदा आला. त्यांच्या कार्यालयात असताना जर कुणाचा फोन वाजला की जयसिंगभाई फोन उचलण्याआधी एक पेन्सिल व कोरा कागद हातात घ्यायचे. फोनवर बोलताना या कागदावर भौमितिक आकारातील सुंदर नक्षीकाम रेखाटत रहायचे. फोन संपेपर्यंत या कागदावर एक सुंदर नक्षी साकारलेली असायची.



# श्री. श्रीनिवास विनायक उर्फ रमेश जोशी



श्रीनिवास विनायक जोशी हे 'रमेश जोशी' नावानी अधिक परिचित आहेत. १९६० मध्ये बी.एस.सी. पूर्ण केल्यावर त्यांनी सुगंधी अत्तरे तयार करण्यासाठी लागणारी केमिकल्स तयार करण्यासाठी स्वत:ची छोटी laboratory सुरु केली. नियतीने या वाटेने त्यांना पुढे जाऊ दिले नाही. १९६१ मध्ये पुण्याजवळचे पानशेत धरण फुटले आणि त्या पुरात त्यांनी उभी केलेली laboratory त्यातील सर्व साहित्य व उपकरणांसह वाहून गेली. एक स्वप्न भंगले पण जिद्द कायम होती. स्वत:चा व्यवसाय करण्याचे मनात होते पण नोकरी करण्याचा मार्ग पत्करून साखर प्लांट उभे करण्याचे काम करणाऱ्या नायक्रोम कंपनीत नोकरीला लागले. त्यांच्यातील गुणवत्तेमुळे नंतर तीनच वर्षांनी ते या कंपनीचे भागीदार झाले.

कंपनीचे मूळ मालक आणि त्यांचे भागीदार श्री.परांजपे यांचे अकस्मात निधन झाले आणि कंपनीची धुरा रमेश जोशी यांच्या खांद्यावर पडली. या भूमिकेत गेल्यावर त्यांनी या कंपनीच्या कामात विलक्षण गती आणली आणि अनेक नव्या गोष्टी सुरु केल्या. त्यातूनच भारतातील पहिली आणि जगातील तिसरी स्वयंचलित सूत मर्सरायजिंग मशीन बनवणारी कंपनी,

आधी द्रवपदार्थ आणि नंतर घनपदार्थ भरू शकणारे भारतातील पहिले पॅकेजिंग मशीन बनवणारी कंपनी असा नावलौकिक या कंपनीला मिळवून दिला. पॅकेजिंग क्षेत्रात तर अल्पावधीतच जगभरात त्यांचे नांव

झाले आणि या क्षेत्राशी संबंधित प्रसिद्ध टेट्रापॅक कंपनीने त्यांच्याबरोबर एकत्रित व्यवसायासाठी करार केला. असा नावलौकिक मिळवलेल्या या कंपनीला आणि रमेश जोशी यांना उद्योग क्षेत्रातील अनेक मानसन्मान मिळाले आहेत.

रमेश जोशी यांची समाजात ओळख फक्त उद्योजक एवढीच नाही तर ते एक उत्तम नावजलेले लेखक आहेत. 'माझी कार्पोरेट यात्रा' या त्यांच्या पुस्तकाच्या अनेक आवृत्या आजवर निघाल्या आहेत. उद्योग क्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या संस्थांचे ते जसे पदाधिकारी आहेत तसे सामाजिक क्षेत्रातही त्यांचे फार मोठे योगदान आहे. भारतीय युवा शक्ती ट्रस्टच्या माध्यमातून त्यांनी अनेक तरुणांना उद्योजक होण्यासाठी अर्थबळा बरोबरच मोलाचे मार्गदर्शनही केले आहे. लहान वयापासून स्काऊट चळवळीत जसे सक्रीय आहेत तसे स्नेहसेवा सारख्या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागासाठी तसेच दुष्काळग्रस्त भागांसाठी खूप मोलाचे उपक्रम यशस्वी केले आहेत. त्यांच्या या ज्ञानाचा, अनुभवच फायदा पुण्यातील राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात संयोजकांनी आवर्जून करून घेतला होता.

वर्धिनीचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तमभाई श्रॉफ आणि कार्याध्यक्ष किशाभाऊ पटवर्धन यांचा अनेक वर्षांपासूनचा परिचय आणि सामाजिक विषयांकडे ओढाही सारखाच. त्यामुळे कार्यकारिणी सदस्य होणे ही औपचारिकता होती इतके ते वर्धिनीच्या कामाशी सुरुवाती पासून जोडलेले होते. वर्धिनीच्या सुरुवातीच्या काळात जेव्हा आर्थिक घडी नीट बसलेली नव्हती तेव्हा काम करणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांना दरमहा योग्य अशी आर्थिक मदत झाली पाहिजे याची त्यांनी त्यांच्या उद्योगातून व्यवस्था केली. सी.एस.आर सारख्या योजना या अलीकडे आल्या पण तसे कायदा नव्हता तेव्हाही जे उद्योजक ही जबाबदारी आपली आहे असे मानत होते त्या यादीत रमेश जोशी यांचे नांव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.


आर्थिक सामाजिक दृष्ट्या अत्यंत अडचणीच्या स्थितीतून डिप्लोमाचे शिक्षण पूर्ण केलेल्या वर्धिनीच्या एका युवा कार्यकर्त्याला

त्यांनी आपल्या कंपनीत नोकरीची संधी तर दिलीच पण पुढे योग्य क्षणी त्याला भारताबाहेर जावूनही नोकरी करण्याची आणि चांगले आर्थिक उत्पन्न मिळवण्याची संधी दिली.

वर्धिनीचे कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी उद्योगक्षेत्रात जसा नियोजनाचा, अर्थबळाचा मनुष्यबळाचा विचार केला जातो तसा वर्धिनीनेही करून आपले काम आहे त्या शक्तीच्या आधारे कसे वाढवता येईल याचा विचार करण्याचे शिक्षण दिले. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने चऱ्होली येथील जागेवर प्रशिक्षण संकुल उभे करण्यासाठीची पूर्वतयारी ही त्याच्या कालावधीत वेगाने सुरु झाली आणि आज तो प्रकल्प आकाराला आला आहे.

एक दिवस श्रीकांतजींनी किशाभाऊंना आणि मला त्यांच्या कार्यालयात बोलावले. त्यांच्या हातात गेल्या आर्थिक वर्षाचा ताळेबंद होता. त्यांनी एक कोरा कागद आमच्यासमोर ठेवला आणि म्हणाले मी सांगतो तो आकडा लिहा. तो आकडा गेल्या आर्थिक वर्षाचा एकूण खर्चाचा होता. ते म्हणाले १०% इन्फ्लेशन आणि १०% कार्यवाढ असे गृहीत धरून येणाऱ्या पुढच्या दहा वर्षांचे एकूण खर्चाचे आकडे काय असतील ते आता कॅलक्युलेट करून लिहा. आकडा वाढत गेला. पुढच्या दहा वर्षांनी एकूण खर्च किती होईल याचा अंदाज ते आकडे पाहून आम्हाला आला. किशाभाऊ व माझ्या चेहऱ्यावरचे भाव श्रीकांतजी टिपत होते. ते म्हणाले आता मला सांगा एवढे पैसे कुठून आणणार! कोण आणणार? त्या प्रश्नाने किशाभाऊंच्या मनात चक्र सुरू झाले व त्यातून वयाच्या ८०व्या वर्षी त्यांनी केलेला अमेरिका व इग्लंडचा दौरा साकारला. या दौऱ्यात पहिल्यांदा मोठी रक्कम देणगी रूपाने वर्धिनीच्या कोषात जमा झाली.

# श्री. कल्याण वर्दे



मूळचे मुंबईचे असलेले कल्याणजी यांचे ७वी नंतरचे शालेय शिक्षण भावे हायस्कूल मधून तर महाविद्यालयीन शिक्षण गरवारे महाविद्यालयातून झाले. इंग्रजी विषय घेऊन पदवी घेतलेल्या कल्याणजी यांची पुढे ओळख 'एक यशस्वी उद्योजक' म्हणून झाली. हिंदुस्तानात जे बनत नाही आणि ज्या साठी विदेशावर अवलंबून राहावे लागते, अधिक पैसे मोजावे लागतात अशाच एखाद्या वस्तू निर्मितीच्या व्यवसायात आपण पडायचे असे ठरवून जिद्दीने ते उद्योग क्षेत्रात पडले. छपाई उद्योगाशी संबंधित स्पेशालिटी केमिकल्स निर्मिती करणाऱ्या त्यांच्या उद्योगाचे या क्षेत्रात फार मोठे नांव आहे आणि या क्षेत्रातील राष्ट्रीय आणि आंतर्राष्ट्रीय कीर्तीचे पुरस्कारही त्यांना मिळाले आहेत. अर्थात त्यांच्या या यशात त्यांच्या उद्योगातील भागीदार आणि संशोधन क्षेत्रात तज्ज्ञ असणाऱ्या त्यांच्या पत्नीचाही मोठा वाटा आहे.

शालेय वयापासून क्रीडा आणि अभिनय या क्षेत्रांची यांनाआवड होती. टेबल टेनिस आणि बॅडमिंटन या क्रीडा प्रकारांमध्ये राज्य पातळी पर्यंत त्यांना बक्षिसे मिळाली आहेत. नाट्य अभिनयात तर माधव वझे यांच्या सारख्या मित्रासह 'कथा कुणाची व्यथा' कुणा या नाटकात त्यांनी भूमिका केली होती आणि या नाटकाला राज्यस्तरीय स्पर्धेत पहिले बक्षिसहि मिळाले होते.

सामाजिक क्षेत्रातही त्यांचे नांव खूप आदराने घेतले जाते. रोटरी क्लबच्या माध्यमातून त्यांनी गव्हर्नर पदाचेही काम पाहिले आहे. आणि या

माध्यमातून बांगला देशामध्ये जावून मोठी सेवा केली आहे. कोकणामध्ये तळागाळातील समाजासाठी, विशेषत: महिलांसाठी काम करणाऱ्या डॉक्टर देवधर यांच्या भगीरथ प्रकल्पाला त्यांनी आपल्या सक्रीय सहभागातून अधिक गतिमान केले आहे. अर्थक्रांती चळवळीलाही सशक्त आणि गतिमान करण्यासाठी ते वेगवेगळ्या आघाड्यांवर शेवट पर्यंत  वय विसरून काम करीत होते.

लेखन क्षेत्रातही कल्याणजी खूप सक्रीय होते. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली ज्या मध्ये मित्र गुणांचे, द्या टक्का दोन टक्के, भेळ अशा पुस्तकांचा समावेश आहे. त्यांनी अलीकडेच लिहिलेली बिल ड्यूरंट हिंदुस्तानची कैफियत आणि  थोडं जनातलं थोडं मनातलं ही दोन्ही पुस्तके वाचकप्रिय ठरली आहेत.

किशाभाऊ पटवर्धन सांगतील तेव्हा आणि ते सांगतील ते आपण करायचं असं सहज कामाशी जोडलेल्या अनेक माणसांपैकी कल्याणजी वर्दे एक होते  त्यामुळे कामाशी अनेक वर्षे जोडलेले पण पुढे किशाभाऊ यांच्याच आग्रहाने कार्यकारिणी सदस्य झाले आणि एक टर्म कार्याध्यक्षही झाले. रमेश जोशी यांनी जे विषय आग्रहाने मांडले होते त्याच विषयांना त्यांच्या नंतर कल्याणजी यांनी गती दिली.

त्यांच्या कार्याध्यक्ष पदाच्या काळात एक मोठा कार्यक्रम त्यांच्या कल्पनेतून आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धिनीने यशस्वी केला तो म्हणजे अडीच दिवसांचे एक राज्य स्तरीय युवा अधिवेशन. त्याचा विषय होता ‘अशी हवी आहे आम्हाला लोकशाही’. या अडीच दिवसाच्या अधिवेशनाला युवकांकडून तर उत्तम प्रतिसाद मिळालाच पण या अधिवेशनात लोकशाही अधिक सशक्त करण्यासाठी जे जे विषय निवडले होते त्या त्या विषयातील तज्ज्ञ वक्ते केवळ कल्याणजी यांच्या एका फोन किंवा पत्राने केलेल्या विनंतीने आले होते. २०२० मध्ये अकस्मात त्यांचे दु:खद निधन झाले. संस्था एका अनुभवी सामाजिक भान असलेल्या संवेदनशील उद्योजक विश्वस्ताला मुकली आहे.

# श्री. त्र्यंबकराव आपटे सर



रा.स्व.संघाच्या शिवाजी मंदिर शाखेचे किशाभाऊ पटवर्धन यांचे सहकारी, शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रातील ज्येष्ठ मार्गदर्शक अशी त्र्यंबकराव आपटे यांची ओळख. कबड्डी आणि खो खो या क्रीडा प्रकारातील ते तज्ज्ञ. 'स्व'–रूपवर्धिनीचे काम सुरु होण्यामध्ये ज्या मोजक्या संघ कार्यकर्त्यांचा किशाभाऊ पटवर्धन सरांबरोबर सक्रीय सहभाग होता त्यातील हे एक व्यक्तिमत्त्व. विज्ञान आणि गणित विषयाचे अनुभवी आणि तज्ज्ञ शिक्षक. वर्धिनी सुरु होण्यापूर्वी किशाभाऊ ज्यांच्या ज्यांच्याशी संवाद करीत होते त्यात त्र्यंबकराव आपटे यांचाही समावेश होता.

वर्धिनी सुरु झाल्यावर दोनच वर्षांनी म्हणजे १९८१ मध्ये वर्धिनीने सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीमध्ये सहभाग घ्यायला सुरुवात केली. त्यावेळी वर्धकांचे झांज लेझीम ढोल वादन प्रशिक्षण करण्यात आपटे सरांचा मोठा वाटा होता. प्रशांत हरहरे, दीपक बोकील अशा मंगळवार पेठेतील कार्यकर्त्यांचाही यामध्ये सक्रीय सहभाग होता. ढोल ताशा शिकवताना त्यांची शिस्त पाहण्यासारखी असायची. ढोलाचा ठेका कसा पडला पाहिजे आणि वादनाची गती या विषयी ते अत्यंत आग्रही असायचे. पण या शिस्तीमुळे पथकामध्ये सुद्धा शिस्त रुजायला मदत झाली. मिरवणुकीतील पहिली २–३ वर्षे ते सक्रीय असलेल्या पेरुगेट परिसरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्याबरोबरच वर्धिनीचे पथक

असायचे आणि त्याचे नेतृत्व अर्थातच आपटे सरांकडे असायचे. १९८३ मध्ये वर्धिनीची पहिली तुकडी दहावीला बसणार होती. वर्धिनीच्या या विद्यार्थ्यांची गणित आणि विज्ञान या विषयांची तयारी आपटे सरांनी करून करून घेतली होती. पुढील काही वर्षे आपटे सरांनी ही जबाबदारी सम र्थपणे सांभाळली. राजकीय क्षेत्रात काही वर्षे आपटे सर नगरसेवक म्हणून कार्यरत होते. या कालावधीतही त्यांचे मार्गदर्शन वर्धिनीमधील विद्यार्थ्यांना नियमित मिळत होते. या कालावधीत तर वर्धिनीच्या मुलींच्या शाखेत सर शिकवायला येत असत. महानगर पालिकेच्या शाळांची परवानगी मिळवताना अनेक अडथळे पार करावे लागायचे पण आपटे सरांसारखे राजकीय क्षेत्रात सक्रीय असूनही शिक्षण विषयात जागरूक असणारे लोकप्रतिनिधी असल्याचा फायदा वर्धिनीला वेळोवेळी झाला.



# श्री. उदय भानुदास गुजर



श्री.उदय गुजर यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील विंग या खेडेगावातील. खंडाळा तालुक्यातील या लहानशा खेड्यात शाळा विठ्ठल–रखुमाईच्या मंदिरातच भरे. या शाळेत ७वी चे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांच्या पालकांनी त्यांना पुढील शिक्षणासाठी आधी भोर येथे आणि नंतर पुण्याला पाठवून दिले. पुण्याच्या प्रसिद्ध बी.एम.सी.सी. महाविद्यालयातून त्यांनी बी.कॉम चे शिक्षण पूर्ण केले. मनामध्ये चार्टर्ड अकौंटंट होण्याची इच्छा होती त्यामुळे त्यावेळी पुण्यात ख्यातनाम असलेल्या श्री परमार यांच्या सी.ए.फर्म मध्ये ते दाखल झाले. या फर्म मध्ये अनुभव घेत आणि खूप अभ्यास करून त्यांनी आयकर व कंपनी कायदा या विषयांमध्ये विशेष गुणवत्ता प्राप्त केली. १९७३ या वर्षी ते सी.ए. झाले. पहिली काही वर्षे गुरुस्थानी असलेल्या श्री बाळासाहेब भिडे यांच्याकडे अनुभव घेत उदय गुजरांनी पुढे याच क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले. आपल्या ज्ञानाचा उपयोग त्यांनी काही वर्षे वाडिया महाविद्यलयात प्राध्यापक म्हणून काम करून अनेक विद्यार्थ्यांना मिळवून दिला. १९८० मध्ये पुण्याच्या सी.ए.इंस्टीट्युटचे अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्याकडे आली. पुढे दिल्लीच्या सेन्ट्रल कौन्सिलचेही ते सदस्य झाले आणि त्याचा उपयोग करून त्यांनी सी.ए.च्या विद्यार्थ्यांना उपयुक्त असे अनेक शैक्षणिक बदल घडवून आणले. शेती हाच मुख्य व्यवसाय असलेल्या गावातून आलेल्या गुजर यांनी शिरीष मराठे या

आपल्या एका सहकाऱ्याच्या मदतीने शेतीमालाच्या किंमती या विषयावर एक शोधनिबंध लिहिला आणि सर्वोत्तम शोधनिबंधाचा त्याला पुरस्कारही मिळाला. त्यांच्याच प्रयत्नांमुळे पुण्याच्या सी.ए.इंस्टीट्युटला स्वत:ची अशी वास्तू उभी करता आली.

खेड्यातच लहानपण गेल्यामुळे आपल्या अनेक बालमित्रांना सोसावे लागलेले हाल त्यांनी जवळून पाहिले होते. शिक्षण पुढे होऊ न शकल्याने त्यांना खूप कष्ट करावे लागत असल्याचे पाहून उदय गुजर यांना खूप वाईट वाटायचे. शिक्षण आणि संस्कारांमुळेच माणसात परिवर्तन होऊ शकते  हे लक्षात घेऊन किमान आपल्या बालमित्रांच्या मुलांची शिकण्याची संधी हुकू नये असं त्यांना मानापासून वाटत होते. त्यासाठी त्यांनी खंडाळा तालुक्यातील शैक्षणिक संस्थेशी स्वत:ला जोडून घेतलं आणि या परिसरातील हजारो मुला मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी शक्य आहे ते ते सर्व सातत्याने करीत आले आहेत. आईवडीलांनी विंग गावातच एक शाळा बांधली होती. ते व्रत पुढे चालू ठेवत आपले कुटुंब आणि मित्रांच्या मदतीने परिघातील अन्य गावांमध्ये आणखीन तीन शाळा त्यांनी बांधल्या आहेत. शालेय मानस तज्ज्ञ असलेल्या आपल्या पत्नीच्या मदतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अनेक शैक्षणिक कार्यशाळा आयोजित केल्या आहेत. अनेक गुणी मुला मुलीना महाविद्यालयीन आणि व्यावसायिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी व्यक्तिगत पातळीवर शिष्यवृत्ती देऊन त्यांनी अनेकांच्या आयुष्याचे कल्याण केले आहे.

उदय गुजर यांचा मूळ पिंड कलाकाराचा आहे ते स्वत: उत्तम छायाचित्रकार आहेत. अनेक नव्या मूर्तिकार, चित्रकार यांना त्यांनी पुढे आणण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे. पालकांमुळे सामाजिक बांधिलकीची भावनाही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक अविभाज्य भाग आहे. वनराई, केअर इंडिया, अशा  अनेक सामाजिक संस्थाशी ते नुसते जोडलेले नाहीत तर त्या त्या संस्थांच्या कामाचा विस्तार होण्यासाठी अथक प्रयत्न करणाऱ्या मध्ये त्यांचे नांव आवर्जून घेतले जाते.  १९८७ पासून 'स्व'–रुपवर्धिनीशी

त्यांचे नाते जुळले आणि तेव्हापासून एक विश्वस्त या नात्याने त्यांचे वर्धिनीच्या कामात खूप बारकाईने लक्ष असते. विशेषतः वर्धिनीच्या कामाला आर्थिक शिस्त लागावी यासाठी त्यांनी दिलेले योगदान खूप महत्त्वाचे आहे. सामाजिक संस्था म्हणून काम करताना अनेक अडचणी येतात अशावेळी त्यांचे मार्गदर्शन फार मोलाचे असते.


सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून त्यांनी अलीकडेच उदय गुजर फौंडेशन मार्फत मुलामुलींच्या कौशल्य विकासाचे कोर्सेस चालवणारी संस्था स्थापन केली असून या संस्थेच्या परिसरात ग्रामीण भागातील १०० मुलींच्या वसतिगृहाची सुद्धा व्यवस्था उभी केली आहे.

**पडद्यामागचे कलाकार**

प्रत्यक्ष काम करणारे समाजाला माहिती होतात पण कार्यालयाचे काम करणारे रोज काम करीत असूनही पडद्यामागेच राहतात. अशा काहींचा हा परिचय. वर्धिनीची इमारत झाल्यावर कार्यालय प्रमुख म्हणून रामकृष्ण रानडे रुजू झाले. शासकीय सेवेतून निवृत्त झालेले रानडे सर स्वतः खूप शिस्तप्रिय आणि स्वच्छता प्रिय होते. ठरल्या वेळेला न चुकता यायचे. आधी आपल्या टेबलाची स्वच्छता स्वतःच करायचे आणि मग त्यांचे काम सुरु व्हायचे. पत्रव्यवहार, फायलिंग, फोन अटेंड करणं, काम पहायला येणाऱ्या प्रत्येकाशी संवाद... अखंड कामात असायचे. त्यांच्यामुळे वर्धिनीच्या कार्यालयाला शिस्त लागली. त्यांच्यानंतर एन. पी. तथा नाना जोशी आले. तुरूंग अधिकारी म्हणून निवृत्त झालेले नाना तसे गप्पांची आवड असलेले. मृदू बोलणे, थोडी अध्यात्माची आणि योग विषयाची आवड असलेले. सर्व अर्थाने सगळ्यांचे 'नाना' झालेले होते. आजोळ प्रकल्पातही त्यांचा सहभाग असे.

चंद्रकांत यशवंत तथा काका भंडारे यांनी नानांनंतर कार्यालयाचे काम पहायला सुरूवात केली. सगळ्या वयोगटाशी सहज संवाद साधणाऱ्या काकांचा पिंड सुद्धा धार्मिकच होता. विशेषतः माऊलींच्या सेवेत जाण्याकडे त्यांचा ओढा अधिक होता. वर्धिनीच्या सर्व विभागातल्या कार्यकर्त्यांशी त्यांचा स्नेहपूर्ण संपर्क कायम राहिला.

# श्री राघवेंद्र तथा बाळाभाई मेहता



येवला येथे जन्म झालेल्या बाळाभाई मेहता यांचे शालेय शिक्षण धुळे येथे तर मुंबई मधून बी.एस.सी आणि कायदा विषयातील पदवीचे शिक्षण पूर्ण झाले. काही वर्षे अनुभवी चुलत्यांच्या मार्गदर्शनाखाली वकिलीच्या व्यवसायात काम केल्यावर न्यायाधीश होण्यासाठीची परीक्षा उत्तीर्ण होऊन १९६३ मध्ये सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हिजन या पदावर त्यांची निवड झाली. कायदा विषयातील तज्ञता आणि गुणवत्तेच्या बळावर बढती मिळत जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी काम पाहिले. त्यांच्या कामाची मुंबई उच्च न्यायालय तसेच केंद्र सरकारने दाखल घेत १९९० साली Computerization of Supreme Court Records या विषयावरील समितीतून महाराष्ट्रातून केवळ त्यांची निवड करण्यात आली. निवृत्तीच्या टप्प्यावर त्यांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा मिळावा या हेतूने शासनाने नव्याने निर्माण केलेल्या न्यायीक प्रशिक्षण संस्थेचे संचालक या नात्याने नागपूर येथे त्यांनी काम पाहिले तसेच त्यांची Debt Recovery A ppelate Tribubnal चे पहिले चेअरपर्सन म्हणून नियुक्ती करण्यात आली. हे पद हायकोर्ट जज्जच्या समकक्ष असते. १९९३ ते १९९८ या कालावधीत संपूर्ण देशभरातील अपील केसेस त्यांच्यापुढे सुनावणीसाठी येत होत्या. निवृत्तीनंतर ज्येष्ठ नागरिक संघ, रविवार पेठेतील गोपाळकृष्ण मंदिर ट्रस्ट अशा अनेक सामाजिक संस्थांच्या कामात बाळाभाई सक्रीय आहेत. वर्धीनीचे संस्थापक अध्यक्ष कै.पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांच्या निकटच्या

परीचयामुळे वर्धिनीची  घटना लिहिताना किंवा पुढे त्याच्यामध्ये कालानुरूप बदल करताना त्यांच्या कायदा विषयातील तज्ज्ञतेचा खूप फायदा झाला. निवृत्तीनंतर ते वर्धिनीच्या कार्यकारिणीचे सदस्यही झाले आणि काही काळ संस्थेचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

## कै. किशाभाऊ पटवर्धन सरांना मिळालेले पुरस्कार




**रा. स्व. संघ जनकल्याण समिती**
**श्री. गुरुजी पुरस्कार २००५**
**(मरणोत्तर)**

**फाय फाऊंडेशन पुरस्कार**
**(१९९६)**



# प्रा.श्रीमती चंद्राताई दलाया



मुंबई येथे प्राध्यापिका या नात्याने अर्थशास्त्र विषय शिकवणाऱ्या चंद्राताई या स्वभावाने अत्यंत ऋजू स्वभावाच्या होत्या. आपले म्हणणे अत्यंत ठामपणे पण नम्रतेने त्या मांडायच्या. त्यांच्या त्या मांडणीतून त्यांची विद्वत्ताही जाणवायची आणि त्या विद्वत्तेला शोभून दिसणारी नम्रताही. कायम पांढऱ्या शुभ्र साडीत असणाऱ्या चंद्राताई याचं व्यक्तिमत्त्वही तसच शुभ्र आणि प्रसन्न होतं. मुंबई येथे राहत असताना 'स्त्री हितकारिणी' या संस्थेच्या माध्यमातून मुंबई महील गरजू महिलांना स्वावलंबी करण्याच्या कामात त्या सहभागी होत्या. निवृत्तीनंतर पुण्यात आल्यावर चंद्राताई पुणे विमेन्स कौन्सिल मध्ये सक्रीय होत्या. वर्धिनीच्या स्वामी विवेकानंद शाखेचे काम सुरु झाल्यावर कुन्तिताई मुजुमदार यांनी त्यांच्या अनेक सहकारी मैत्रीणींना वर्धिनीच्या कामाशी जोडले त्यातील एक म्हणजे चंद्राताई. त्या त्यावेळी बाणेर रोड वरील सिंध हौसिंग सोसायटीत राहत होत्या आणि विद्यापीठ चौकातील विवेकानंद शाखा त्यांच्या घराजवळ होती. वर्धिनीच्या कामाचे मोल लक्षात घेऊन त्या वर्धिनीच्या कार्यकारिणीच्या सदस्यही झाल्या. अर्थसंकल्पावर त्या अतिशय अभ्यासपूर्ण मांडणी करीत असत. १९८८ मध्ये वर्धिनीची इमारत मंगळवार पेठेत बांधून झाल्यावर शारदामणी महिला विभाग सुरु करण्यामध्ये आणि त्याला दिशा आणि गती देण्यामध्ये कुन्तिताई यांच्या बरोबरीने चंद्राताई यांचे मार्गदर्शन फार मोलाचे ठरले.


# प्रा.श्रीमती उष:प्रभा देसाई



एस.एन.डी.टी. महाविद्यालयात अकौंटस विषयाच्या ख्यातनाम प्राध्यापिका असलेल्या उष:प्रभा देसाई यांचं एक वेगळचं व्यक्तिमत्त्व आहे. अत्यंत मोजकं पण नेमकं बोलणाऱ्या उष:प्रभा देसाई या त्यांचे दोन बंधू अरुण देसाई आणि रवींद्र देसाई यांच्या माध्यमातून वर्धिनीच्या संपर्कात आल्या. ज्येष्ठ बंधू अरुण देसाई हे कै.किशाभाऊ पटवर्धन सर यांच्या घराजवळ राहत होते तर दुसरे बंधू रवींद्र देसाई हे ज्ञानप्रबोधिनी मार्फत चालणाऱ्या ग्राम विकसनाच्या अनेक उपक्रमात (विशेषत: गोबर ग्यास प्लांट उभारणी अशा विषयात) सहभागी असत. किशाभाऊ पटवर्धन हे ज्ञानप्रबोधिनीच्या स्थापनेपासून सक्रीय असणाऱ्या कार्यकर्त्यांपैकी एक होते त्यामुळे त्यांचा आणि रवींद्र यांचा परिचय होता.

वर्धिनीच्या विवेकानंद शाखेत त्या इंग्रजी विषय शिकवण्याच्या निमित्ताने संपर्कात आल्या आणि त्यांची सामाजिक संस्थांच्या संदर्भातील संस्थांच्या घटना, संस्थांचे हिशेब या विषयातील तज्ज्ञता लक्षात घेऊन वर्धिनीने त्यांना संस्थेच्या कार्यकारिणीचे सदस्य करून घेतले त्यांच्या तज्ज्ञतेचा वर्धिनीच्या खूप उपयोग झाला वर्धिनीच्या घटनेमध्ये जेव्हा काही बदल करायचे होते त्या वेळी त्यांनी आणि कै.पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांनी खूप अभ्यास करून आवश्यक असे बदल करून त्याला मंजूरी मिळवली.

# श्री.कन्हैया नथमल बलदोटा



शालेय शिक्षण पुण्यातीलच रविवार पेठेतील भारत इंग्लिश स्कूल मधून झालेल्या कन्हैया बलदोटा यांचा वर्धिनीचे संस्थापक कै.किशाभाऊ पटवर्धन सर यांच्याशी अनेक वर्षांचा परिचय. किंबहुना पटवर्धन सर बलदोटा कुटुंबाच्या अत्यंत निकटचे होते. मेकॅनिकल डिप्लोमाचे शिक्षण पूर्ण झाल्यावर स्वत:चा वर्कशॉप सुरु करण्याचे मनामध्ये होते. त्याला उपयुक्त म्हणून दीड दोन वर्षे बजाज आटो आणि वनाझ त्यांनी कंपनीमध्ये काम केले. स्वत:चा वर्कशॉप सुरु करण्याचे मनात होते पण त्याचवेळी ESSO या कंपनीची गणेशखिंड रस्त्यावर एक पेट्रोल पंप चालवायला देण्यासंबंधी जाहिरात आली होती. योगायोगाने प्रशिक्षणार्थीमधून कन्हैया बलदोटा यांनाच हा पंप चालवायला मिळाला. पाच वर्षे हा पंप ते चालवीत होते. वडील नथमलजी अत्यंत दूरदृष्टीचे होते. आगामी काळात जमिनीला खूप भाव येईल हे लक्षात घेऊन त्यांनी त्या वेळच्या पुण्याच्या हद्दीबाहेरील जमिनी विकत घेण्याचा व्यवसाय सुरु केला. या व्यवसायात कन्हैयाने लक्ष घालावे अशी त्यांची इच्छा होती त्या नुसार ते या व्यवसायात पडले व त्यातूनच पुढे त्यांनी स्वत:चा लँडमार्क कंन्स्ट्रक्शन कंपनी भागीदारीत सुरु केली. अनेक वर्षे यशस्वीपणे हा व्यवसाय केल्यावर श्री श्रीकांत सामल यांच्या भागीदारीत सामल बलदोटा अँड असोसिएट्स या नावाने व्यवसाय सुरु केला. या माध्यमातून अनेक देखण्या निवासी आणि व्यावसायिक

वास्तू उभ्या केल्या. अत्यंत शांत आणि मितभाषी स्वभावाचे बलदोटा हे कवितेच्या विश्वात रमून जातात. ओशोंच्या समोर बसून त्यांच्याकडून जीवनविषयक तत्वज्ञान ऐकण्याची संधी त्यांना अनेकदा मिळाली. त्यांच्या प्रवचनांचा आणि साहित्याचा त्यांच्यावर खूप प्रभाव आहे. आपल्या पालकांच्या नावाने सुरु केलेल्या दोन ट्रस्टच्या माध्यमातून शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या किमान पन्नास संस्थाना ते मदत करतात. विद्याज्योती या गतिमंद विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या संस्थेचे ते उपाध्यक्ष आहेत. वर्धिनीच्या कामात गेल्या पंचवीस वर्षांपासून कन्हैयाजी सक्रीय आहेत. अनेक वर्षे वर्धिनीचे कोषाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली आहे.

**वनवास हा सुखाचा !!**

वर्धिनीची स्वतःची इमारत नसताना कार्यालयाचा जसा फिरता रंगमंच अनेक वर्षे होता तसं १९८१ ते १९८३ या कालावधीत खेळ आणि अभ्यास तासिकांची व्यवस्था पण वेगवेगळ्या जागी करावी लागत होती. महानगरपालिकेने शाळा आणि मैदान वापरण्याची दिलेली परवानगी अचानक रद्द केली आणि शाखा चालवण्याऱ्यांसमोर दोन मोठी प्रश्नचिन्हं उभी राहिली. खेळ कुठे घ्यायचे? आणि अभ्यास तासिकांची व्यवस्था कुठे करायची? पण हे दोन्ही प्रश्न चुटकीसरशी सुटले. यामध्ये संस्थापक विश्वस्त मंडळातील काही जणांनी केलेल्या व्यवस्थेमुळे आणि परिसरातील काही सज्जन व्यक्तींनी मदतीचा हात पुढे केल्याने शाळा आणि मैदान उपलब्ध नाही ही अडचण जाणवलीच नाही. पुणे कडबाकुट्टी व्यापारी संघाच्या वजन काट्याची जागा, कांचन भाई शहा यांची कडबाकुट्टी, त्यामागची गोठ्याची जागा, लडकतांचं सायकल दुकान, मारोतराव पाटोळे यांच्या इमारती मागची मोकळी जागा, सिद्धेश्वर मंदिरालगतचे मैदान आणि खोली, शेठ हिरालाल सराफ प्रशालेतील वर्गखोल्या अशा कितीतरी व्यवस्था वर्धिनीला उपलब्ध झाल्या. या सगळ्यामध्ये दोन वर्षे कशी गेली हे समजले पण नाही.

# श्री.वामनराव अभ्यंकर



मूळचे कोकणातील असलेले श्री.वामनराव उर्फ भाऊ अभ्यंकर हे शालेय शिक्षणानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी आणि पुढे बी.एड.चे शिक्षण पूर्ण करण्यासाठी पुणे येथे आले. पांढरे शुभ्र धोतर, पांढरा सदरा आणि त्यावर पांढरी टोपी हा भाऊचा वेश सुरुवातीपासून अखेरपर्यंत तोच कायम राहिला. किंबहुना भाऊ अभ्यंकर हे नांव घेतले की त्यांना ओळखणाऱ्या प्रत्येकाच्या डोळ्यासमोर भाऊंचे हेच रूप उभे राहत होते. संस्कृत आणि गणित हे त्यांचे अध्यापनाचे आवडीचे विषय. दोन वर्षे हे विषय भाउंनी देवगड विद्यालयात शिकवले आणि पुढे पुण्यात स्थायिक झाल्यावर नु.म.विद्यालयात शिकवण्याचे काम केले.


नु.म.वि.मधील नोकरी स्थिर असताना १९६९ च्या सुमारास डॉक्टर अप्पासाहेब पेंडसे हे सुरु करीत असलेल्या ज्ञान प्रबोधिनी या शिक्षणातील नव्या प्रयोगामध्ये ते सहभागी झाले आणि नु.म.वि.मधील स्थिर नोकरी सोडून ते ज्ञान प्रबोधिनीच्या कामात सक्रीय झाले. १९६९ ते २०२१ अशा ५० वर्षांच्या कालावधीत भाऊंनी ज्ञानप्रबोधिनीच्या पुण्यातील प्रशालेचे प्राचार्य, संस्थेचे कार्यवाह आणि जवळपास ३५ वर्षे ज्ञान प्रबोधिनीच्या निगडी येथील कामाची शून्यातून सुरुवात करून निगडी येथील नवनगर विद्यालयाचे नांव शिक्षणक्षेत्रात खूप मोठे केले. या संपूर्ण कालावधीत ते निगडी केंद्राचे प्रमुख म्हणून कार्यरत होते. निगडी येथील या केंद्राद्वारे भाऊंनी विद्यार्थी, युवक युवती आणि सामान्य नागरिक यांना सहभागी व्हावं असं वाटेल असे अनेक अभिनव उपक्रम, कार्यक्रम सुरु केले आणि

रुजवले. त्यांनी मांडलेली गुरुकुल संकल्पना आज किमान दहा शाळांमध्ये प्रत्यक्षात आली आहे. पंचकोशातून शिक्षण, २१व्या शतकातील शिक्षण, शिक्षणाचा पंचादार, शिक्षण विवेक अशा पुस्तकांच्या माध्यमातून त्यांनी केलेले चिंतन हा शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी एक मोठा ठेवा आहे.

एक उत्तम शिक्षक, उत्तम मुख्याध्यापक, प्रशासक तसेच एक उत्तम लेखक आणि वक्ता  अशी त्यांची कितीतरी रूपे समाजाने पाहिली. भाऊ एक उत्कृष्ट पुरोहित आणि एक उत्तम प्रवचनकारही होते.

अशी विद्वत्ता लाभलेले भाऊ हे मुख्यत: एक हाडाचे कार्यकर्ते होते आणि त्यामुळे शिक्षणाच्या वाटेवर नव्याने सुरु झालेल्या आणि त्याच्याच एका सहकाऱ्याने सुरु केलेल्या ‘स्व’–रुपवर्धिनीच्या कामात किशाभाऊ पटवर्धन सरांनी हाक देताच भाऊ काम करायला उभे राहिले. स्वत: प्रचंड व्यस्त असतानाही आपल्या व्यस्ततेत स्वत:ची थोडी अडचण करून घेत पण किशाभाऊ करीत असलेल्या वर्धिनीच्या या कामासाठी त्यांनी वेळ दिला. वर्धिनीची स्वत:ची वास्तू मंगळवार पेठेत उभी राहत असताना भूमिपूजन असो किंवा वास्तुपूजा, भाऊ ‘पुरोहित‘ या भूमिकेत उभे होते. वर्धक वर्धीकांसाठी, युवक युवतींसाठी जेव्हा जेव्हा वर्धिनीने त्यांना हाक दिली, भाऊ वेळ काढून मार्गदर्शन करण्यासाठी उपलब्ध असायचे. सांसारिक जबाबदाऱ्या पेलणारे आणि तरीही संन्यस्त वृत्तीने शिक्षण क्षेत्राची साधना करणारे एक साधक असं हे व्यक्तिमत्त्व होतं. त्यांच्या सहयोगामुळे, सहकार्यामुळे आणि त्यांनी दिलेल्या योगदानामुळे वर्धिनीच्या कामाला दिशाही मिळाली आणि गतीही.

# कै जयंत शंकर कवठेकर



रा.स्व.संघाच्या शाखांमध्ये जे जे स्वयंसेवक सूर्यनमस्कार घालायला शिकले आहेत किंवा अशा लक्षावधी स्वयंसेवकांना जयंतरावांच्या सूर्यनमस्कारांच्या स्थिति पाहून प्रेरणा मिळाली आहे. जयंतरावांच्या आयुष्यात सूर्यनमस्कार हाच श्वास आणि आयुष्याचाही तोच ध्यास  अशी स्थिती आली त्यामागेही एक प्रेरणादायी घटना आहे. रा. स्व. संघाच्या कार्यपद्धतीमध्ये सूर्यनमस्कारांच्या किती स्थिती असाव्यात आणि त्यातील प्रत्येक स्थिती आदर्श म्हणजे नेमकी कशी हे नक्की करायचे होते. ज्येष्ठ संघ कार्यकर्ते कै. बापूराव दात्ये यांनी या विषयासाठी योग्य स्थितीत सूर्यनमस्कार घालू शकतील असे तीन स्वयंसेवक निवडले गेले. या तिघांमधून जयंतराव निवडले गेले. तत्कालीन सरसंघचालक श्री गुरुजी, श्री मोरोपंत पिंगळे आणि बापूराव दात्ये यांच्या उपस्थितीत झालेलल्या एका बैठकीत सूर्यनामस्कारच्या प्रत्येक स्थितीचे वर्णन केले जायचे आणि त्यानुसार त्या स्थितीत जयंतराव थांबायचे. या दरम्यान अनेकदा श्री गुरुजी जयंतराव यांचेकडून आवश्यक अशी स्थिती करून घेत.  त्या स्पर्शाने जयंतरावाना एक विलक्षण अनुभूति येत होती. त्या विलक्षण स्पर्शाने त्यांना जगण्याचे ध्येय सापडले आणि सूर्यनमस्कार हा त्यांच्या जगण्याचा श्वास होऊन गेला.

लहान वयातच मातृछत्र हरपलं, तंत्र शिक्षण घेताना एक डोळ्याला इजा झाल्याने शिक्षणाची दिशा बदलावी लागली, विवाह झाला पण

पत्नी आणि लहान वयातील मुलगी असा दोघांच्या वियोगाला सामोरं जावं लागलं. दुसऱ्या विवाहाचे सुखही फार वर्षं लाभलं नाही. ज्यांना ज्यांना जयंतरावांचा सहवास लाभला त्या प्रत्येकाने हे पाहिलं आहे की जयंतराव जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पहाणारे होते आणि त्यामुळे सतत कार्यमग्न असायचे. शिक्षकीपेशा मनापासून स्वीकारला असल्याने विद्यार्थ्यांमधील सूप्त गुणांना वाव देण्यासाठी अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ते सतत सक्रिय असायचे. केवळ विद्यार्थीवर्गातच नाही तर शिक्षक सहकाऱ्यांमध्येही जयंतराव लोकप्रिय होते. त्यांनी पेण मधील शाळेतील शेकडो विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा दिली. स्वेचछानिवृत्ती घेऊन जयंतराव पुण्याला परत आले आणि सर्व वेळ सामाजिक कामात गढून गेले.

शिक्षण पूर्ण झाल्यावर आर. डी. हायस्कूलमध्ये पहिल्यांदा ते शिक्षक म्हणून रुजू झाले होते. तेव्हापासून त्यांचा कै.पटवर्धन सरांशी परिचय होता. राजाभाऊ लवळेकर सर यांच्याशी सुद्धा त्यांचा अनेक वर्षांपासून परिचय होता, स्नेह होता. पुण्यात परतल्यावर या दोघांशी बोलून त्यांनी वर्धिनीचे काम करायचा निर्णय केला आणि काम करायला सुरुवात केली. आधी वर्धिनीमधील आजोळ प्रकल्प आणि पुढे अनेक वर्ष वर्धिनीच्या मासिक वृत्त आणि वार्षिक कार्यवृत्ताचे संपादक म्हणून त्यांनी प्रचंड काम केलं. त्यांच्याकडून ज्या ज्या वर्धक वर्धिकानी किंवा शाळेतील विद्यार्थ्यांनी क्रांतिकारक कथा ऐकल्या आहेत, सावरकरांच्या कवितांचे रसग्रहण ऐकले आहे त्यांच्या त्यांच्या मनात सहजपणे देशाचा अभिमान फुलायचा, आपणही देशासाठी काही काम केलं पाहिजे हा भाव रुजायचा.

सहकारनगर भागातील त्यांच घर हे त्या भागातील संघाचे अघोषित कार्यालयच होते. संघ शाखेत तर ते सक्रिय असायचेच पण योगी अरविन्द सांस्कृतिक मंचांच्या माध्यमातून त्यांनी परिसरांसाठी प्रचंड काम केले. पुण्यात परत आल्यावर जयंतरावांनी पेणच्या सुबक मूर्ती विक्रीसाठी

त्यांच्या घरीच एक दालन उघडले. गणेशमूर्ती घ्यायला येणाऱ्या कितीतरी कुटुंबांना 'स्व'–रूपवर्धिनी, वनवासी कल्याण आश्रम, जनकल्याण समिति अशा सामाजिक संस्थांच्या कामास जोडले.

आपल्याकडील शक्य ते अधिकाधिक समाजाला सहजपणे देऊन टाकण्याचा हा जयंतरावांचा स्वभाव होता आणि तो शेवटच्या श्र्वासापर्यंत कायम होता.१६ एप्रिल २०२१ रोजी जयंतराव कवठेकर यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या इच्छापत्रानुसार त्यांची ही राहती वास्तु जनकल्याण रक्तपेढीला प्रदान केली आहे.

**आपलं काम हे ईश्वरी कार्य आहे**

१९८५ मध्ये संस्थापक विश्वस्तांनी केलेल्या निर्धारामुळे मंगळवार पेठेतच एका सेवावस्ती समोर आणि नाल्याला लागून एक भूखंड वर्धिनीने खरेदी केला. लगेचच आर्किटेक्ट गणोरकर यांची नियुक्ती करुन इमारतीचा आराखडा तयार करण्यात आला. चार मजली त्या आराखड्याला मंजूरी पण मिळाली. या सगळ्या गोष्टी वेगाने घडत होत्या. जनता बँकेकडे कर्जासाठी अर्ज करण्यात आला तो मंजूर होऊन चार लाखांचे कर्ज मान्य झाले. प्रत्यक्ष कर्ज घेण्यापूर्वी संस्थापक विश्वस्तांची एक बैठक झाली. सर्वांनी एकमुखाने निर्णय केला की कर्ज घेऊन बांधकाम करायचे नाही. प्रत्येकाने निधी देऊ शकतील अशी आपल्या मित्रांच्या नावांची सूची केली. त्याच बैठकीतून त्यांना फोन करुन तीन वर्षांसाठी बिनव्याजी ठेव देण्याचे आवाहन केले गेले. आश्चर्य म्हणजे चार लाख रुपयांची आश्वासनं त्याच बैठकीत मिळाली. यथावकाश रक्कम जमाही झाली आणि बांधकामाचा शुभारंभ झाला. किशाभाऊ कायम म्हणायचे 'आपलं काम हे ईश्वरी कार्य आहे,' त्याची प्रचीती आली.

# विद्याधर चिंतामण लोंढे सर



महापालिकेच्या शाळा आणि त्यातून मिळणारे शिक्षण, त्याचा दर्जा हा अनेकांचा चेष्टेचा विषय असतो. परंतु महापालिकेच्या शाळेमध्ये शिकून खऱ्या अर्थाने जीवनामध्ये यशाच्या शिखरावर पोहोचले अशी अनेक व्यक्तिमत्त्व समाजामध्ये आजही पहायला मिळू शकतात. याचे कारण महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यादार चिंतामण लोंढे यांच्यासारखे मुलांना शिकवण्यासाठी जीवाचं रान करणारे आणि शिकवण्यातच आपली सर्व ऊर्जा खर्च करणारे तपस्वी शिक्षकही असतात. वर्धिनी मध्ये शिकणाऱ्या मुलांचं भाग्य की लोंढे सरांचं मार्गदर्शन त्यानांही अनेक वर्षं मिळालं.

शिक्षक, पर्यवेक्षक, शालाप्रमुख अशा वेगवेगळ्या भूमिका लोंढे सरांनी पुणे महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये वठवल्या आणि शेवटी बोपोडीच्या सर्वपल्ली राधाकृष्णन शाळेतून शालाप्रमुख पदावरून ते १९८८ मध्ये निवृत्त झाले. शाळेतून निवृत्त झाले तरी शिकवण्याचा त्यांचे व्रत चालू होतेच कारण १९७९मध्ये वर्धिनीच काम सुरु झालं होतं. किशाभाऊ पटवर्धन सर आणि लोंढे सर यांचा स्नेह सुद्धा असा होता की किशाभाऊ म्हणाले आणि लोंढे सरांनी जमणार नाही असं म्हटलं असं होऊच शकणार नव्हतं विज्ञान विषयाचे शिक्षक असलेल्या लोंढे सरांनी ‘माझ्या शहरातील विज्ञान’ अशा विषयाला वाहिलेला एक अभिनव उपक्रम १९८६ साली सुरु केला होता. पुणे जिल्हा अध्यापक संघाचे अध्यक्षपदही पाच वर्षे भूषविले होते. रसायन विषयातील त्यांची तज्ज्ञता लक्षात घेऊन एस.एस.सी बोर्डाने


त्यांचा समावेश ९ वी १० वी च्या रसायनशास्त्र विषयाच्या लेखन मंडळात केला होता. दरवर्षी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करणाऱ्या लोंढे सरांना १९८७ या वर्षीचा राज्य सरकारचा आदर्श शिक्षक पुरस्कारही मिळाला होता.

अजातशत्रू, सौम्य बोलणं आणि प्रत्येकाच्या चांगल्या गोष्टींना प्राधान्य देत संपर्कातील सर्वांच्या मदतीने लोंढे सर ३२ वर्षांहून अधिक काळ औपचारिक शिक्षण क्षेत्रात कार्यरत होते. निवृत्त झाल्यावर मनातील अनेक योजना साकारण्यासाठी कार्यरत होते. फिरती प्रयोगशाळा हा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी वर्धिनीचा जो प्रकल्प आज हजारो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतो आहे त्याची संकल्पना रुजवण्यात लोंढे सरांचे योगदान खूप मोठे होते. दुर्दैवाने त्यांच्या मार्गदर्शनाच्या आधारे सुरु होणाऱ्या या प्रकल्पात त्यांचा प्रत्यक्ष सहवास मिळू शकला नाही कारण १९९६ साली त्यांचे देहावसान झाले.

**प्रार्थनेची जन्मकथा**

संस्थेचे नांव नक्की करताना जितक्या गंभीरपणे चर्चा झाली होती तशीच चर्चा वर्धिनीची प्रार्थना जन्माला घालताना झाली होती. कै. किशाभाऊ, राजाभाऊ यांनी आपल्याला या कामातून प्रार्थनेद्वारे नेमका कोणता संस्कार रुजवायचा आहे त्याचे मुद्दे ठरविले. या मुद्द्यांना केंद्र स्थानी ठेवून अशी प्रार्थना रचू शकतील अशा कार्यकर्त्यांना भेटून, त्यांना कामामागचा उद्देश सांगून प्रार्थनेत काय यायला हवयं यासंबंधी त्यांनी चर्चा केली. प्रत्यक्षात कुणी एकाने ही रचना बांधली नाही. श्री. विनय हर्डीकर, श्री. अशोक निरफराके, स्वत: राजाभाऊ लवळेकर आणि सौ. देव बाई यांच्या रचनांचे संकलन करून राजाभाऊ लवळेकर यांनी वर्धिनीची प्रार्थना शब्दबद्ध केली.

# श्री.सुधाकर म.जोशी



न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग या शाळेच्या शिक्षक विश्राम कक्षामध्ये भेटायला गेल्यावर अत्यंत शांत स्वभावाचे दिसणारे सु.म.जोशी सर गप्पा मारायला लागल्यावर त्यांच्यातील मिश्किल स्वभावाचे दर्शन घडायचे. कदाचित समोरच्या व्यक्तीचा अंदाज आल्याशिवाय ते असं व्यक्त होत नसावेत. तीन बहिणी आणि पाच  भाऊ असलेल्या एका कुटुंबात सोलापूर येथे जन्म झालेले सु.म. घरच्या आर्थिक प्रतिकूल वातावरणातही सकारात्मक विचारांच्या आधारावर संघर्ष करीत करीत शिकले. लहानपणापासून संघ शाखेत झालेल्या संस्कारांमुळे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी आपल्या उमेदीच्या वयातील काही वर्षे संघाच्या कामाला अर्पण केली आणि प्रचारक या नात्याने काम करू लागले. सहा वर्षे प्रचारक म्हणून काम केल्यावर घरची जबाबदारी पेलण्यासाठी पुन्हा कौटुंबिक जीवनात समरस झाले. लग्नानंतर पुण्याला नोकरीच्या निमित्ताने आले. काही महिने व्हल्कन लाव्हल या कंपनी मध्ये तर  काही महिने रेल्वेमध्ये त्यांनी काम केले पण मन रमेना. त्यामुळे न्यू.इंग्लिश स्कूल रमणबाग या शाळेत क्लार्क म्हणून काम करू लागले. या ठिकाणी त्यांचा राजाभाऊ लवळेकर सरांशी संपर्क आले. त्यांच्या प्रोत्साहनामुळे १९७२ मध्ये त्यांनी बी.एड चे शिक्षण पूर्ण केले आणि रमणबाग शाळेत शिक्षक म्हणून काम करू लागले. इतिहास आणि  गणित विषयाची तज्ज्ञता असलेल्या सु.म.जोशी सर यांचे हस्ताक्षर अतिशय देखणे होते. राजाभाऊ लवळेकर सरांनी सांगताच वर्धिनीच्या शाखे मध्ये गणित शिकवायला लागले. बालपणापासून संघ स्वयंसेवक असल्याने राजाभाऊंसारख्या ज्येष्ठ अधिकारी व्यक्तीने व्यक्त

केलेली अपेक्षा ही त्यांच्यासाठी आज्ञाच होती.

केवळ 'स्व'–रूपवर्धिनी मध्येच सु.म. शिकवायला जात होते असं नाही. पूर्व भागातील संघ स्वयंसेवकांसाठी सुद्धा सु.म. वेळ काढून शिकवण्याचे काम करीत होते. या आर्थिक उत्पन्न देणाऱ्या शिकवण्या नव्हत्या तर शिकवत राहणं हे त्यांचं व्रत होतं. अलिकडेच 'स्व'– रुपवर्धिनीने चऱ्होली येथे कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राचे मोठे बांधकाम पूर्ण केले. या बांधकामासाठी ज्या कंपनीची निवड बांधकाम कंत्राटदार म्हणून संस्थेने केली ते योगायोगाने पूर्व पुण्यातीलच होते आणि वर्धीनीचे काम त्यांना सांगायला लागल्यावर ते सहजपणे म्हणाले अहो मी सु.मं.चा विद्यार्थी आहे, मला वर्धिनीच्या कामाची पूर्ण कल्पना आहे आणि त्यामुळे माझ्यासाठी हे काम केवळ व्यावसायिक म्हणून नाही तर सु.म.जोशी सरांचा विद्यार्थी म्हणून पण आहे.

वर्धिनीमध्ये दुपारच्या वेळात सुरु झालेल्या आजोळ प्रकल्पातही सु.मं. चे मोलाचे योगदान होते. निवृत्तीच्या काळात संध्याकाळच्या शाखेबरोबरच दुपारचा हा प्रकल्प त्यांच्या मार्गदर्शनामुळे सुदृढ स्थितीमध्ये उभा राहिला. अध्यापना बरोबरच संघटना म्हणून जी जी जबाबदारी त्यांच्यावर या विभागात त्यांच्यावर सोपवली जात होती, ती ती जबाबदारी ते सहजपणे पेलत होते.

पूर्वी रास्ता पेठेत राहणारे सु.म. कालांतराने कर्वेनगर येथे राहायला गेले पण वर्धिनीच्या कामापासून दूर गेले नाहीत. ते कर्वेनगर मध्ये चालणाऱ्या शाखेतील वर्धकांना शिकवण्यासाठी जायला लागले. वर्षानुवर्षे काम करणारे आणि तरीही कोणत्याही पदाची, कौतुकाची, पुरस्काराची अपेक्षा न बाळगणारे सु.म.जोशी सर यांच्यासारखे कार्यकर्ते हे खऱ्या अर्थाने 'पत्थर पायातील' या उक्तीतील उदाहरण होते. आज विस्तारलेलं काम, काळाच्या पडद्याआड गेलेल्या सु.म. यांच्या सारख्या कार्यकर्त्यांनी केलेल्या परिश्रमाचा परिणाम आहे ही कृतज्ञतेची भावना काम करणाऱ्या सर्वांच्या मनात कायम राहणं खूप महत्त्वाचं आहे.

# श्री.दि.रा.भसे सर



संस्थेचं 'स्व'–रुपवर्धिनी हे नावही जेव्हा ठरलं नव्हतं त्या वेळी कै.किशाभाऊ पटवर्धन सर, कै.राजाभाऊ लवळेकर सर हे ज्यांच्या आधारावर हे काम सुरु करण्याचे नक्की करीत होते त्यातील एक नांव म्हणजे श्री.दिगंबर रामचंद्र भसे सर. न्यू इंग्लिश स्कूल–रमणबाग या शाळेतील एक शांत स्वभावाचे, थोडे मितभाषी स्वभावाचे असलेले परंतु विद्यार्थ्यांमध्ये प्रिय असलेले शिक्षक. विज्ञान हा त्यांचा आवडीचा आणि अर्थातच शाळेतील शिकवण्याचा विषय. १९६६ ते १९९१ या कालावधीत त्यांच्या हाताखालून हजारो विद्यार्थी तयार झाले पण शिक्षकांच्या डोळ्यासमोर या विद्यार्थ्यांची छबी, त्यांची नांवे, त्यांची विशेषता अशा अनेक गोष्टी कायम असतात. वयाच्या नव्वदीमध्ये असलेल्या भसे सर यांच्याशी बोलत असताना त्यांनी वर्धिनीचे काम सुरु झाले तेव्हा असलेल्या पहिल्या तुकडीतील आणि जे रमणबागेत शिकत होते अशा दोन विद्यार्थ्यांचे वर्णन करून विचारले ही मुलं आता काय करतात?

सिन्नर येथे राहत असताना भसे सर यांचे घर हे रा.स्व.संघाच्या प्रचारकांचे, प्रवासी कार्यकर्त्यांचे, इतकच काय गावात कीर्तनासाठी आलेल्या कीर्तनकारांसाठी हक्काचे घर. पुण्यात शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांचे प्रशिक्षण /प्रबोधन आणि त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडून ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद या संस्थेचे निष्ठावान कार्यकर्ते. कार्यवाह म्हणून या संस्थेचे काम केले. हे काम अर्थातच सेवा म्हणून आणि ते ही जवळपास तीस वर्षे. अशा संस्थांची/ संघटनांची पदं ही मानासाठी कमी आणि मान मोडून काम करण्यासाठी

अधिक असतात हे असं काम करणाऱ्या कार्यकर्त्यांशी संवाद साधताना लक्षात येतं आणि तरीही त्यांना आंपण थोडं काम करू शकलो याचा आनंद वाटतो. याच संघटनेचं 'शिक्षक संदेश' नावाचं एक मासिक प्रसिद्ध होतं. या मासिकासाठी मजकूर मिळवणं, त्याची छपाई, छापलेल्या संदेश पत्रिकांवर सदस्यांचे नांव पत्ते चिकटवणे आणि ठरल्या दिवशी या सगळ्या पत्रिका पोस्टात पडतील याची काळजी घेणे ही अशी कामं भसे सर व्रत म्हणून वर्षानुवर्षे करीत होते.

शाळा, शिक्षक संघटनेच काम, शिक्षक संदेश पत्रिकेचं काम अशी कसरत करणाऱ्या भसे सरांना जेव्हा राजाभाऊ आणि किशाभाऊ यांनी सुरु होणाऱ्या वर्धिनीच्या कामाबद्दल सांगितलं आणि शिकवायची जबाबदारी सोपवली तेव्हाही त्यांनी आता हे काय आणखी सांगता असं न म्हणता आपल्याकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी शाळा सुटल्यावर मंगळवार पेठेतील वर्धिनीच्या शाखेकडे त्यांची पावले वळायची. वर्धिनी आज ज्यां रुपात आहे ते रूप, तो विस्तार हा ज्यांच्या श्रमातून झाला आहे त्यातील हे एक व्यक्तिमत्त्व. शिक्षक हा पेशा नसून वृत्ती असते हे ज्यांच्याकडे पाहून पटतं असं हे व्यक्तिमत्त्व.





**गरजू मुली-महिलांसाठी सुरू होणाऱ्या होम नर्सिंग कोर्सच्या उद्घाटन कार्यक्रमात कुंतीताई आणि चंद्राताई**

# सन्माननीय सदस्य

वर्धिनीचे काम समाजापर्यंत पोहोचण्यासाठी संस्थापक सदस्यांनी, विशेषत: कै.किशाभाऊ पटवर्धन व कै.पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांनी समाजातील अनेक मान्यवर व्यक्ती वर्धिनीच्या सन्माननीय सदस्य व्हाव्यात यासाठी खूप मेहनत घेतली आणि त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक मान्यवर व्यक्ती या वर्धिनीच्या कामाशी नुसत्या जोडल्या गेल्या नाहीत तर त्या सर्वांनी वर्धिनीचे काम वाढावे, या मुलभूत कामात काही अडचणी येवू नयेत आणि आल्या तर त्या सोडवण्यासाठी शक्य ते सर्व साह्य केले आहे. त्यांच्या अशा पडद्यामागे राहून पण सक्रीय असण्यामुळे वर्धिनीचे काम विस्तारले. अशा मान्यवरांचा हा अल्प परिचय–

# पद्मविभूषण डॉक्टर रघुनाथ माशेलकर



१ जानेवारी १९४३ रोजी डॉक्टर माशेलकर यांचा जन्म गोव्यातील माशेल या गावी झाला. बालपणीच वडिलांचे छायाछत्र हरवल्याने आई त्यान घेऊन मुंबई येथे आली. त्यांचे औपचारिक शिक्षण झालेले नसल्याने अत्यंत कष्टाची कामे करीत त्यांनी आपल्या मुलांचे संगोपन केले. शिक्षण नसल्याने काय काय सोसावं लागतं याचा अनुभव रोजच्याच जगण्यात त्या घेत होत्या त्यामुळे त्यांनी असा निर्धार केला की माला कितीही कष्ट सोसावे लागले तरी चालतील पण मी माझ्या मुलाला जगातील सर्वोच्च शिक्षण देईन. आपल्या आईने केलेला हा निर्धार त्यांच्या मुलाने शंभर टक्के सार्थ ठरवला. पहिली पी.एच.डी. प्राप्त झाल्यावर जेव्हा माशेलकर आपल्या आईला म्हणाले की आई आता झालं कां तुझं समाधान? त्यावर आई म्हणाली की नाही तुला याच्याही पुढे शिकायचं आहे. डॉक्टर माशेलकरांनी एकूण ४३ पी.एच.डी.पदव्या धारण केल्या आहेत. २५ वी पी.एच.डी.मिळाल्यावर ते आईला म्हणाले आई आता तुझं काय मत आहे. तेव्हा आई म्हणाली की हो आता मी समाधानी आहे की तू माझ्या अपेक्षा पूर्ण केल्या आहेस.

आर्थिक परीस्थिती जरी अनुकूल नव्हती तरी मित्र आणि मुख्यत: शिक्षकांनी डॉक्टर माशेलकरांना शिकण्यासाठी, पुढे जाण्यासाठी खूप प्रोत्साहन दिले. उच्च शिक्षणाच्या वेळी टाटा ट्रस्टची मिळालेली ६०/- रुपयांची शिष्यवृत्ती ही त्यांच्या दृष्टीने पुढे शिकण्याचा रस्ता प्रशस्त करणारी ठरली.

रसायन शास्त्रातील त्यांच्या बुद्धिमत्तेचा  केवळ भारतात नाही तर सर्व जगामध्ये आदर केला जातो. जागतिक पातळीवरील शास्त्रज्ञ म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. आयुष्यातील किमान १२ वर्षे अनवाणी चालाव्या लागलेल्या आणि सार्वजनिक दिव्याखाली बसून अभ्यास कराव्या लागलेल्या माशेलकरांना जेव्हा इंग्लंड मध्ये ज्या रजिस्टर मध्ये न्यूटनने सही केली आहे त्या रजिस्टर मध्ये सही करण्याचा सन्मान मिळाला तेव्हा केवळ त्यांचीच नाही तर सर्व भारतीयांची, विशेषत: महाराष्ट्रातील जनतेची मान अभिमानाने ताठ झाली कारण हा सन्मान मिळालेली पहिली महाराष्ट्रीयन व्यक्ती ठरले.

यशाची एकेक पायरी चढत जात एका टप्प्यावर डॉक्टर माशेलकर हे इन.सी.एल.चे प्रमुख संचालक झाले. त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा आणि विशेषत: त्यांच्या दूरदर्शी व्यक्तित्त्वाचा उपयोग व्हावा म्हणून भारत सरकारने त्यांना सी.एस.आय.आर. चे महासंचालक म्हणून नियुक्त केले. त्यांच्या या कारकिर्दीमध्ये देशातील सर्व संशोधन प्रयोगशाळांच्या मानसिकतेत अमुलाग्र बदल झाला. आपण जगामध्ये स्पर्धा करू शकतो. आपल्या ज्ञानाच्या बळावर देशासाठी महत्त्वाचे संशोधन आणि देशाला मोठे अर्थबळ प्राप्त करून देणारी कामे करू शकतो हा आत्मविश्वास वाढीला लागला आणि आज त्याचे लाभ आपण सगळेजण अनुभवतो आहोत. केंद्र सरकार आणि विविध राज्य सरकारे यांना विज्ञान विषयात जे मार्गदर्शन लागत असते ते गेल्या कित्येक दशकांपासून डॉक्टर माशेलकर यांचे लाभत आहे.

नवसर्जन आणि संशोधन या गोष्टी म्हणजे डॉक्टर माशेलकर यांच्या श्र्वास उच्छवास आहेत इतके ते यामध्ये रममाण असतात. वयाची ८०वर्षे होऊन गेलेली ही व्यक्ती आहे हे त्यांच्या उत्साहाकडे त्यांच्या काम करण्याच्या झपाट्याकडे पाहून वाटतच नाही. पण केवळ एक शास्त्रज्ञ ही त्यांची ओळख अपुरी आहे. संशोधनाच्या कामा इतकेच ते सामाजिक क्षेत्रात सक्रीय आहेत. वर्धिनीशी तर गेल्या किमान २५ वर्षांपासून त्यांचे घट्ट नातं आहे. अनेक वर्षे संस्थेचे सन्माननीय सदस्य तर ते आहेतच पण २०१६ पासून संस्थेचे अध्यक्ष या नात्याने त्यांच्याच नेतृत्त्वाखाली वर्धिनीची वाटचाल चालू आहे. वर्धिनीसारख्या जवळपास सत्तर सामाजिक संस्थांशी

ते जोडलेले आहेत आणि हे जोडणं म्हणजे केवळ त्यांचे पदाधिकारी म्हणून नाही तर त्या त्या संस्थांना त्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असते. प्रचंड आशावाद हे डॉक्टर माशेलकर यांचे फार मोठे वैशिष्ट्य आहे. जेव्हा अशी प्रचंड आशावादी व्यक्ती नेतृत्त्व करीत असते तेव्हा त्या त्या संस्थांचे भवितव्य कसे असेल हे सांगण्याची आवश्यकताच रहात नाही.


डॉक्टर माशेलकर यांचे आणखीन एक वैशिष्ट्य जाणवते ते म्हणजे त्यांच्या संशोधनाचा, मार्गदर्शनाचा आणि प्रोत्साहन देण्याचा केंद्रबिंदू समाजातील गरीब व्यक्तीचं सुख हाच राहिलेला आहे. मग ती हळदीच्या पेटंट विरुद्धची लढाई असो, मुली महिलांसाठी अत्यंत स्वस्त सॅनिटरी पॅड निर्मितिचा विषय असो किंवा अंजली माशेलकर फौंडेशन मार्फत दिले जाणारे पुरस्कार असो, सर्व ठिकाणी या देशातील गोरगरिबाला या संसोधनाचा, नवनिर्मितीचा लाभ सहज मिळावा आणि आर्थिक बोजा सोसावा लागू नये हाच विचार त्या मागे असतो. आणि यामुळेच वर्धिनीच्या कामात ते समरस होऊन गेले आहेत.

डॉक्टर माशेलकर यांच्या नेतृत्त्वाखाली वर्धिनी संस्थेच्या सुर्वण महोत्सवी वर्षापर्यंत आजपेक्षा कितीतरी अधिक विस्तारलेली आणि समाजातील गरीबीचे उच्चाटन करण्यासाठी शिक्षणाच्या विविध माध्यमातून समर्थपणे आणि सेवाभावाने कार्य करणारी संस्था म्हणून कार्यरत असेल असा ठाम विश्वास वाटतो.



**वर्धिनीचे मार्गदर्शक एका निवांत क्षणी**

# पद्मश्री श्री प्रतापराव पवार



विद्यार्थी सहाय्यक समितीचे संस्थापक कै.अच्युतराव आपटे यांच्या माध्यमातून किशाभाऊ आणि प्रतापराव पवार यांचा परिचय झाला. एखाद्या व्यक्तीचा नव्याने परिचय झाला की किशाभाऊंचा त्या व्यक्तीशी इतका संपर्क वाढायचा की त्या नव्याने ओळख झालेल्या व्यक्तीलाही समजायचे नाही की आपले स्नेहबंध कधी जुळले आणि पक्के झाले. प्रतापराव यांच्याही बाबतीत तसेच झाले.

१0वीत प्रवेश करणाऱ्या वर्धिनीच्या पहिल्या तुकडीचे एक महिन्याचे निवासी शिबिर १९८२ च्या मे महिन्यात होते. या शिबिराच्या सम ारोपाला किशाभाऊनी प्रतापरावाना समारोपाला प्रमुख अतिथी म्हणून बोलावले होते. पुढे प्रतापराव वर्धिनीच्या कार्यकारिणीचे सदस्यही झाले आणि काही कालावधी वर्धिनीचे उपाध्यक्ष पदही त्यांनी भूषवलं आहे. समाजासाठी चालणाऱ्या चांगल्या कामांना आपल्याला शक्य आहे ती मदत सहजपणे करायची हा प्रतापराव पवार यांचा स्वभाव आहे आणि त्यामुळे आपण वर्धिनीचे पदाधिकारी आहोत की नाही असा प्रश्न त्यांना कधी पडलाच नाही. अशाच एका भेटीमध्ये प्रताप्रवांनी दैनिक सकाळच्या एक प्रमुख विश्वस्त डॉक्टर बानू कोयाजी यांचा किशाभाऊंना परिचय करून दिला.


पोलिसांच्या मुलांकडूनच घडणाऱ्या गुन्ह्यांमुळे अस्वस्थ असलेल्या पुण्याच्या तत्कालीन पोलीस कमिशनर साहेबांना प्रताप्रराव यांनी

आग्रहपूर्वक वर्धिनीचे काम पहावे आणि आपल्या समोर असलेली समस्या सोडवायची असेल तर पोलिसांची मुलं वर्धिनीच्या शाखेत जायला हवीत असं आग्रहपूर्वक सुचवलं. चांगल्या कामाला आणि सरळमार्गाने चालणाऱ्यांनाच अनेक अडचणींचा सामना करावा लागतो असा अनेकदा अनुभव येतो. वर्धिनीला अशा अनेक अडचणींचा सामना करावा लागला. पण अशावेळी येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी प्रतापराव वेळोवेळी धावून आले आहेत. मूळातच शिक्षण विषयासंबंधी प्रतापरावाना खूप आस्था आहे. अडचणींवर मात करून शिकणारे विद्यार्थी असोत किंवा त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्था असोत, प्रतापराव नेहमीच अशा कामासाठी मदतीला उत्सुक असतात. त्याचं वर्णन करायचं तर 'सामाजिक संस्थांचे पालक' असं त्याचं सार्थ वर्णन होईल.

**कार्यालयाचा फिरता रंगमंच**

वर्धिनीची स्वतःची इमारत नव्हती तोपर्यंत म्हणजे १९८८ पर्यंत वर्धिनीचे कार्यालय हा 'फिरता रंगमंच' होता. एम. व्ही. कुलकर्णी, ॲडव्होकेट प्रभाकरपंत लकडे, डॉ.वा.धुं.आगटे अशांच्या घरांमध्ये वर्धिनीची कपाटे, सामान, कार्यालयीन साहित्य-साधनं ठेवलेली होती. यापैकी कुठल्याही घरी गेलं तरी जाणाऱ्याचं मनापासून स्वागत व्हायचं. प्रसंगी स्वतःची गैरसोय करुन घेत ही सर्व कुटुंबं वर्धिनीच्या कामाला प्राधान्य देत होती. या सगळ्या कुटूंबांमुळे वर्धिनीचं काम स्वतःची जागा नसतानाही सुरळीत चालू होते आणि वाढत होते. यातील एम. व्ही. कुलकर्णी यांनी तर वर्धिनीला मिळालेल्या एका देणगीचा फलक (मार्बल फरशी) आपल्या घराच्या दर्शनी भागाच्या भिंतीवर आनंदाने बसवून घेतली होती. हे सारे कुटुंबिय खऱ्या अर्थाने संस्थेचे पालकत्व निभावत होते.

# श्री. अविनाश वारदेकर



एक यशस्वी उद्योजक म्हणून श्री अविनाश वारदेकर याचे समाजात एक मोठे स्थान होते. वेस्टर्न इंडिया इरेक्टर्स या आपल्या कंपनीच्या मार्फत त्यांनी देश आणि विदेशात, विषेशत: मध्यपूर्व देशानांमध्ये अनेक मोठे बांधकाम प्रकल्प उभे करून मोठे नांव मिळवले होते.

अविनाश वारदेकर हे बॅडमिंटन या खेळाचे मोठे चाहते तर होतेच पण या क्षेत्रात त्यांनी केलेले काम देशाच्या दृष्टीने सुद्धा फार मोलाचे आहे. १९८१ च्या आसपास जेव्हा प्रकाश पदुकोन या खेळाडूने जागतिक विजेतपद पटकावले होते त्यावेळी भारतामध्ये सरावासाठी चांगले सुसज्ज असे स्टेडियम नव्हते. वेस्टर्न इंडिया इरेक्टर्स या आपल्या कंपनी मार्फत श्री वारदेकर यांनी ही जबाबदारी स्वीकारली आणि पुण्यामध्ये एक सुसज्ज असे बॅडमिंटन खेळासाठीचे स्टेडियम उभारण्यात मोठी भूमिका बजावली. त्यांच्या या योगदानामुळेच पहिल्यांदा जागतिक पातळीवरची स्पर्धा यशस्वीपणे भारताने आयोजीत केली.

वारदेकर हे पुण्यातील प्रोग्रेसिव एज्युकेशन, महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्था अशा अनेक शैक्षणिक संस्थांशी निगडीत होते. 'स्व'–रुपवर्धिनीचे सन्माननीय सदस्य म्हणून त्यांनी वर्धिनीच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये फार मोलाची मदत केली आहे. आज सी.एस.आर या नावाने उद्योगांचे सामाजिक कामाशी नाते कायद्याने जोडले गेले आहे. पण असा कायदा नसताना त्यांनी सामाजिक ऋण म्हणून आपल्या उद्योगाच्या माध्यमातून तसेच


वैयक्तिक पातळीवर वर्धिनीला काही कालावधी दर महिन्याला आर्थिक मदत केली होती. हा काळ असा होता की जेव्हा वर्धीनीची आर्थिक घडी बसलेली नव्हती आणि कामही समाजापर्यंत तेवढे पोहोचलेले नव्हते. अशा कालावधीत या व्यक्तींनी केलेली मदत ही शब्दांत व्यक्त करताच येत नाही.

# डॉक्टर एम.एस.तथा नानासाहेब पवार



राहुरी कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉक्टर एम.एस. तथा नानासाहेब पवार हे १९८४ ते १९९४ या कालावधीत वर्धिनीचे सन्माननीय सदस्य होते. कृषी क्षेत्रातील त्यांचे योगदान तर मोठे आहेच पण सामाजिक विषयात विशेषत: गरजू घटकातील विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी ते अतिशय मनापासून मदतीला धावून येत असत. आणि त्यांच्या याच स्वभावामुळे ते वर्धिनीच्या कामाकडे आकृष्ट झाले. समाजातील अनेक मान्यवरांना वर्धिनीचे काम सांगून त्यांना वर्धिनीला जोडण्याचे काम त्यांनी केले. त्याच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुद्धा वर्धिनीला अधिकाधिक आर्थिक मदत मिळवून देण्याचे काम करीत होत्या.

# श्री प्रमोद चौधरी



जागतिक पातळीवर प्राज या आपल्या कंपनीच्या माध्यमातून श्री प्रमोद चौधरी यांचे मोठे नांव आहे. मुळचे फलटण येथील असलेल्या प्रमोद चौधरी यांचे शालेय शिक्षण पुण्याच्या न्यू.इंग्लिश स्कूल रमणबाग या शाळेतून झाले. वर्धिनीचे संस्थापक सदस्य कै.राजाभाऊ लवळेकर हे त्यांचे शिक्षक. इंजिनीरिंगच्या शिक्षणानंतर काही काळ नोकरी केल्यावर स्वत:चा उद्योग उभा करण्याच्या आपल्या स्वप्नाला त्यांनी आकार द्यायला सुरुवात केली. पर्यावरणाचे संतूलन राखण्यासाठी आवश्यक अशा इथेनॉल निर्मितीसाठी प्लांट उभे करण्यामध्ये जागतिक पातळीवर त्यांच्या 'प्राज उद्योगाचे' फार मोठे नांव आहे. पर्यावरण सुरक्षेच्या क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा अनेक मानाचे आंतरराष्ट्रीय पुरसकार देऊन जगानेच त्यांना अभिवादन केले आहे. प्राज फौंडेशन मार्फत पर्यावरण रक्षणासाठी अनेक उपक्रम राबवले जातात.

'स्व'–रुपवार्धिनीच्या कामाशी गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ ते जोडलेले आहेत. बिबवेवाडी परिसरात वर्धिनीची शाखा सुरु झाली त्यावेळी दर आठवड्याला शाखेतील वर्धकाना पूरक आहार देण्यापासून ते १९९६ मध्ये ग्रामीण भागात फिरती प्रयोगशाळा सुरु झाल्यावर या प्रकल्पाला खऱ्या अर्थाने गती आली ती त्यांनी दिलेल्या जीप मुळे. या वाहनामुळे प्रकल्प सर्वार्थाने गतिमान झाला. चऱ्होली येथे गरजू मुली व महिलांसाठी जे प्रशिक्षण संकुल उभारणीचे काम चालू आहे त्यामध्ये ही त्यांचे फार मोलाचे योगदान आहे.

# पद्मश्री श्रीमती अनुताई वाघ



अनुताईं यांचा वयाच्या तेराव्या वर्षी इ.स. १९२३ साली शंकर वामन जातेगावकर यांच्याशी विवाह झाला. परंतु सहा महिन्यांतच वैधव्य आले. असे असूनसुद्धा तत्कालिन सामाजिक रूढींचे बंधन झुगारून त्यांनी शिक्षण घेतले व शिक्षिका म्हणून काम करीत असताना त्यांना ताराबाई मोडक भेटल्या आणि त्यांनी ताराबाईंच्या बोर्डी (ठाणे) येथे आदिवासींसाठी असलेल्या ग्राम बाल शिक्षण केंद्रात प्रवेश केला. तेथे इ.स.१९४७ ते १९९२ अशी ४७ वर्षे त्यांनी निरपेक्ष वृत्तीने ग्रामशिक्षणाचे कार्य चालवले. पुढे कोसबाडच्या नूतन बाल शिक्षण केंद्राच्या चालक, राष्ट्रीय शिक्षण अनुसंधान व प्रशिक्षण मंडळाच्या कार्यकरिणी सदस्य, अखिल भारतीय पूर्व प्राथमिक शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. त्यांचे शिक्षणविषयक ग्रंथ इंग्रजी, हिंदी, गुजराथीतून अनुवादित झाले.

वनवासी बांधवांच्या शिक्षणासाठी सर्व आयुष्य वाहून घेतलेल्या अनुताई यांच्या हस्ते १९८६ साली वर्धिनीच्या मंगळवार पेठेतील वास्तूच्या जागेचे भूमिपूजन झाले होते. या निमित्ताने त्यांचा वर्धिनीच्या कामाशी संपर्क आला आणि गोरगरीब लोकांच्या मुलामुलींच्या कल्याणासाठी सुरु असलेल्या वर्धिनीच्या सन्माननीय सदस्य म्हणून त्या १९८६ पासून अखेर पर्यंत कार्यरत होत्या.

भूमिपूजनाच्या कार्यक्रमासाठी त्या जेव्हा मंगळवार पेठेतील जागेपाशी पोहोचल्या त्याच वेळी नेमकी महानगर पालिकेची कचरा उचलून नेणारी

गाडी आली आणि वर्धिनीच्या जागेजवळच असलेल्या त्यावेळच्या कचरा कुंडीतून अतिशय दुर्गंधी काही काळ पसरली. आपल्यासाठी आलेल्या या ज्येष्ठ सामाजसेविकेला जो त्रास झाला तो पाहून लवळेकर सर त्यांना म्हणाले अनुताई क्षमा करा आम्ही नकळत का होईना तुम्हाला अगदी नरकयातना दिल्या आहेत पण आम्हाला तर इथेच काम करायचे आहे. त्या हसून म्हणाल्या अहो नका वाईट वाटून घेऊ आणि काळजीही करू नका कारण इथे गोकुळ उभे राहणार आहे. त्यांचे हे शब्द म्हणजे एका शिक्षण क्षेत्रातील तपास्वीनीने दिलेले आशीर्वाद होते कारण पुढच्या काळात वर्धिनीचे काम अनेक अंगांनी विस्तारले.



# पद्मभूषण डॉक्टर बानू कोयाजी



पद्मभूषण आणि मेगेसेसें पुरस्कारांनी सन्मानित बानुबाई एक जगप्रसिद्ध व्यक्तिमत्त्व होतं. आरोग्य क्षेत्रात त्यांनी केलेल्या सेवेमुळे त्यांना जागतिक कीर्ती लाभली होती. इतकं मोठं नांव असलेली ही व्यक्ती मात्र अत्यंत साधी होती. व्यवसायाने डॉक्टर आणि पुण्यातील के.ई.एम. रुग्णालयाच्या प्रमुख पण त्यांनी अनेक वर्षे काम करूनही के.ई.एम. मधून पगार घेतला नाहि. घरासाठी त्या स्वत:चा खाजगी दवाखाना थोडा वेळ चालवायच्या व त्या उत्पन्नातून घरखर्च करायच्या.

प्रतापराव पवार यांच्यामुळे किशाभाऊ आणि त्यांचा परिचय झाला आणि त्या वर्धिनीच्या कामाशी कायमच्या जोडल्या गेल्या. त्या म्हणायच्या की के.ई.एम आणि सकाळ नंतर वर्धिनीचे काम माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. बानुबाई यांच्यामुळे वर्धिनीतील रुग्णसहाय्यक अभ्यासक्रम तयार करू शकणाऱ्या कलबाग मॅडम वर्धिनीला जोडल्या गेल्या आणि त्यांच्या प्रत्यक्ष शिकवण्यामुळे शेकडो गरजू मुली स्वत:च्या पायावर उभ्या राहिल्या. बानुबाई यांनी आपल्या हॉस्पिटल मधील डॉक्टरांना वर्धीनिसाठी आठवड्यातून एक दिवस काढायला सांगितला आणि त्यातून गरीब वस्त्यांमधील महिला व मुलांसाठी साप्ताहिक आरोग्य केंद्र सुरु झाले. या केंद्रतील डॉक्टरांच्या मार्गदर्शनामुळे, योग्य सल्ल्यामुळे खूप चांगल्या संख्येने कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया ही होऊ शकल्या.

वर्धिनीची फिरती प्रयोगशाळा सुरु झाली होती. ग्रामीण भागातील

प्रतिसाद वाढत होता आणि त्यासाठी एका मोठ्या गाडीची आवश्यकता होती. बानुबाईनी ही जबाबदारी स्वत:वर घेतली आणि जे.आर.डी आणि थेल्मा टाटा ट्रस्ट मधून मोठी गाडी घेण्यासाठी तसेच हा प्रकल्प पुढे तीन वर्षे चालवण्यासाठी मोठी देणगी मिळवली. वयाच्या ८० वयानंतरही १६ ते १८ तास कार्यरत राहणाऱ्या बानुबाई या खरोखरीच सर्वस्व अर्पण करून समाजाची सेवा करीत होत्या.

# श्री.के.एम.दिवाणजी

श्री.के.एम.दिवाणजी (सुप्रसिद्ध सॉलिसीटर्स, मुंबई) वर्धिनीच्या कामाच्या निमित्ताने निधी संकलनासाठी किशाभाऊ पटवर्धन यांच्या मुंबई भेटी सातत्याने सुरु असायच्या आणि अशा भेटींमध्ये समाजाच्या वेगवेगळया क्षेत्रातील तज्ज्ञ माणसाना वर्धिनीच्या कामाला जोडण्याचा त्यांचा प्रयत्न असे. त्यातुनच मुंबई मधील सुप्रसिद्ध वकील आणि सॉलिसिटर्स के.एम.दिवाणजी हे वर्धिनीच्या कामाला १९८५–८६ या कालवधीत वर्धिनीचे मान्यवर सदस्य म्हणून जोडले गेले. प्रत्यक्ष वर्धिनीच्या कामात व्यवसायातील व्यस्ततेमुळे ते कधी येवू शकले नाहीत पण 'नाम ही काफी है' असे ज्या काही व्यक्तींच्या बाबतीत अनुभवायला मिळतं ते दिवाणजी यांच्या बाबतीत वर्धिनीने अनुभवले. ते या कामाशी जोडलेले आहेत एवढ्या एका गोष्टीने सुद्धा वर्धिनीला अनेक ठिकाणी अनुकूल प्रतिसाद मिळत असे.

# मा.फाझलअली फाझलभोय

मुंबई येथील सुप्रसिद्ध व्यावसायिक श्री फाझलअली फाझलभोय हे १९८४ सालच्या संक्रांत उत्सवाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या निमित्ताने वर्धिनी समाजातील गोरगरीब समाजातील गुणी मुला मुलींसाठी करीत असलेले काम त्यांनी जवळून पाहिले. कार्यक्रमानंतर जेव्हा किशाभाऊ पटवर्धन त्यांना भेटले आणि किशाभाऊ यांनी त्यांना विनंती केली की आपण वर्धिनीचे सन्माननीय सदस्यत्त्व स्वीकारावे तेव्हा त्यांनी तत्काळ या प्रस्तावाला मान्यता दिली आणि पुढे काही वर्षे ते या भूमिकेत वर्धिनिशी जोडलेले राहिले.



# निरपेक्ष सेवेचा शासनाने केलेला सन्मान









प्रकाशक :

**'स्व'-रूपवर्धिनी**

२२/१ मंगळवार पेठ, पारगे चौक,

पुणे - ४११ ०११.